




https://epaper.vidarbhaprajasattak.com

RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १८ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## शेतकऱ्यांना आशेचा किरण : राज्यात २१ लाख शेतकऱ्यांना होणार १,३५६ कोटी वाटप

## अमरावती विभागात ५६५ कोटी ६० लाख ३० हजारांच्या मदतीस मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

मुंबई : सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१ हेक्टर वरील बाधित पिकांच्या मदतीसाठी १३५६ कोटी ३० लाख २२ हजार रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तसेच, जुलै व ऑगस्ट २०२५ या महिन्यांत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या १९ लाख २२ हजार ९०९ शेतकऱ्यांच्या १५ लाख ४५ हजार २५०.०५ हेक्टरवरील शेतपिकाच्या नुकसानीपोटी १ हजार ३३९ कोटी ४९ लाख २५ हजारांच्या मदतीसही मान्यता देण्यात आली आहे.

नैसर्गिक आपत्तीत मृत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना तसेच पशुधनाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना मदत थेट जिल्हास्तरावरूनच दिली जाणार आहे. त्यामुळे शासनस्तरावर प्रस्ताव पाठविण्याची आवश्यकता राहणार नाही त्यांना मदत त्वरित व कार्यक्षम पद्धतीने वितरित होईल.अशी माहिती मकरंद जाधव-पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री यांनी दिली.



**जुलै-ऑगस्टमध्ये झालेल्या नुकसानीची भरपाई**

अमरावती विभाग : अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांतील ७,८८,९७४ शेतकऱ्यांच्या ६,५४,५९५.४२ हेक्टरवरील नुकसानीपोटी ५६५ कोटी ६० लाख ३० हजारांच्या मदतीस मान्यता.

नागपूर विभाग : गोंदिया, भंडारा, वर्धा गडचिरोली आणि नागपूर जिल्ह्यांतील ३७,६३१ शेतकऱ्यांच्या २१,२२४.६४ हेक्टरवरील नुकसानीपोटी २३ कोटी ८५ लाख २६ हजारांच्या मदतीस मान्यता.

पुणे विभाग : कोल्हापूर जिल्ह्यातील ३६ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या ८ हजार ८३५.१५ हेक्टरवरील शेत पिकाच्या नुकसानीपोटी १४ कोटी २८ लाख ५२ हजारांच्या मदतीस मान्यता.

छ. संभाजीनगर विभाग : हिंगोली, बीड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील १० लाख ३५ हजार ६८ शेतकऱ्यांच्या ८ लाख ४८ हजार ४४५.३७ हेक्टरवरील नुकसानीपोटी ७२१ कोटी ९७ लाख ८६ हजारांच्या मदतीस मान्यता.

नाशिक विभाग : नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहिल्यानगर जिल्ह्यांतील २४ हजार ६७७ शेतकऱ्यांच्या १२ हजार १४९.४६ हेक्टरवरील शेत पिकाच्या नुकसानीपोटी १३ कोटी ७७ लाख ३१ हजारांच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे.

**सप्टेंबरमधील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अशी मिळेल मदत**

| जिल्हा | शेतकरी | बाधित क्षेत्र (हेक्टर) | मदत (रुपये) |
|---|---|---|---|
| सातारा | ११,११३ | ४.२१९.२८ | ६.२९ कोटी |
| कोल्हापूर | ५,८६० | १,६९६.३६ | ३.१८ कोटी |
| बीड | ८,०६,५१३ | ६,४४,९१८.५५ | ५७७.७८ कोटी |
| धाराशिव | ४,०४,६५६ | ३,११,२९१.२३ | २९२.४९ कोटी |
| लातूर | ४,१५,४९२ | २३,०६,६२८.९९ | २०२.३८ कोटी |
| परभणी | ४,३९,२९७ | २,८५,८५३.७८ | २४५.६४ कोटी |
| नांदेड | ८३,२६७ | ३२,०७३.०२ | २८.५२ कोटी |

## तेज प्रताप यादवांनी भावाविरोधात उतरवला उमेदवार, राघोपूरमधून प्रेम कुमार यादव लढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८पाटणा**

यादव कुटुंबाचा बालेकिल्ला असलेल्या राघोपूर विधानसभा मतदारसंघात यावेळी रंगतदार लढाई होताना दिसणार आहे. तेजस्वी यादव या मतदारसंघातून निवडणूक लढत असून, त्यांच्याविरोधात तेज प्रताप यादव यांनीही आपल्या पक्षाचा उमेदवार उतरवला आहे. त्यामुळे दोन्ही भावातील राजकीय संघर्ष आणखी वाढताना दिसू शकतो. तेज प्रताप यादव यांनी युवक राष्ट्रीय जनता दलाचे माजी महासचिव प्रेम कुमार यादव याना उमेदवारी दिली आहे.




तेज प्रताप यादव यांना विधानसभा निवडणूक लागण्याच्या काही महिने आधी लालू प्रसाद यादवांनी कुटुंबातून बाहेर काढले. त्यानंतर तेज प्रताप यादव यांनी जनशक्ती जनता दल या पक्षाची स्थापना केली. बिहार विधानसभा निवडणुकीत ते स्वतःही उतरले असून, तेजस्वी यादव निवडणूक लढवत असलेल्या राघोपूर विधानसभा मतदारसंघातून प्रेम कुमार यादव यांना उमेदवारी दिली आहे.प्रेम कुमार यादव हे राघोपूरचेच रहिवाशी आहेत. पूर्वी ते लाल प्रसाद यादव यांच्याच राष्ट्रीय जनता दलामध्ये होते. युवक राष्ट्रीय जनता दलाचे महासचिव म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे. तेज प्रताप यादव पक्षातून बाहेर पडल्यानंतर प्रेम कुमार यादव यांनीही राजद सोडली.

**तेज प्रताप यादव महुआतून लढणार**

जनशक्ती जनता दल पक्षाचे संस्थापक अध्यक्ष असलेले तेज प्रताप यादव हेही विधानसभा निवडणूक लढवत आहेत. तेज प्रताप यादव यांनी १५ ऑक्टोबर रोजी वैशाली जिल्ह्यातील महुआ विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महुआ विधानसभा मतदारसंघातून तेजस्वी यादव यांनी राजदच्या मुकेश रौशन यांना उमेदवारी दिली आहे. ते या मतदारसंघाचे आमदार आहेत. पक्षाने पुन्हा त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. पण, यादव कुटुंबातीलच तेज प्रताप यादव या मतदारसंघातून उतरल्याने येथील निवडणूकही चुरशीची होणार असल्याचे बोलले जात आहे.

## आयपीएल लिलाव पुन्हा परदेशात : दुबई, मस्कत किंवा दोहात १५-१८ डिसेंबर दरम्यान लिलाव

### २० मार्चपासून आयपीएल सुरू होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

आयपीएलचा लिलाव पुन्हा एकदा परदेशात होणार आहे. २०२६ च्या हंगामासाठीचा हा लघु-लिलाव १५ ते १८ डिसेंबर दरम्यान दुबई, मस्कत किंवा दोहा यापैकी एका ठिकाणी होणार आहे, असे बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दैनिक भास्करला सांगितले.

गेल्या आठवड्यात काही माध्यमांनी असा दावा केला होता की यावर्षीचा लिलाव भारतातील एका शहरात होणार आहे. गेल्या वर्षी, २०२४ मध्ये, आयपीएलचा मेगा लिलाव सौदी अरेबियातील जेद्दाह येथे झाला होता. तरीही, भारतात स्थळांचा अभाव आणि लॉजिस्टिक आव्हाने ही कारणे म्हणून उद्धत करण्यात आली होती.

**यजमानपदाच्या शर्यतीत दुबई आघाडीवर**




यावेळी लिलावासाठी दुबई, मस्कत आणि दोहा ही नावे चर्चेत आहेत. दुबईला सर्वात प्रबळ दावेदार मानले जाते, कारण ते केवळ बीसीसीआय आणि आयपीएल फ्रँचायझींसाठी उत्कृष्ट पायाभूत सुविधा प्रदान करत नाही तर गेल्या काही वर्षांत तेथे अनेक यशस्वी कार्यक्रमांचे आयोजन देखील केले आहे.

२०१४ मध्ये, जेव्हा भारतातील सार्वत्रिक निवडणुकांमुळे सुरुवातीचे आयपीएल सामने परदेशात हलवण्यात आले तेव्हा युएईची निवड करण्यात आली. २०२० आणि २०२१ मध्ये, कोविड-१९ साथीच्या काळातही संपूर्ण आयपीएल युएईमध्ये आयोजित करण्यात आला होता.

मस्कत (ओमान) हा पर्याय म्हणून देखील विचारात घेतला जात आहे, कारण बीसीसीआयचे तेथे चांगले संबंध आहेत आणि एक लहान पण आधुनिक क्रिकेट संकुल आहे. दोहा (कतार) हे प्रथमच एक संभाव्य ठिकाण म्हणून चर्चेत आले आहे, जे दर्शवते की बीसीसीआय आता आखाती देशांमध्ये आपली क्रिकेट उपस्थिती आणखी मजबूत करण्याचा विचार करत आहे.

**पुढील आयपीएल हंगाम २० मार्चपासून सुरू होऊ शकतो**

बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने असेही सांगितले की, पुढील वर्षीचा आयपीएल हंगाम २० मार्च रोजी सुरू होऊ शकतो. २०२५ च्या देशांतर्गत हंगामाचे वेळापत्रक लक्षात घेऊन बोर्ड आयपीएल थोडे लवकर सुरू करू इच्छित आहे, जेणेकरून संपूर्ण स्पर्धा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पूर्ण करता येईल. यामुळे खेळाडूंना जून-जुलैमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी किंवा इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल.

**आयपीएल लिलाव आता एक जागतिक स्पर्धा बनली आहे**

आयपीएल आता फक्त एक भारतीय लीग राहिलेली नाही. गेल्या काही वर्षांत, लिलाव हा एक जागतिक कार्यक्रम देखील बनला आहे. फ्रँचायझी मालकांव्यतिरिक्त, जगभरातील एजंट, विश्लेषक आणि खेळाडू व्यवस्थापक या कार्यक्रमात सहभागी होतात.

परदेशात हा कार्यक्रम आयोजित केल्याने केवळ चांगल्या सुविधा मिळत नाहीत तर आंतरराष्ट्रीय मीडिया कव्हरेज देखील वाढते. बीसीसीआयच्या अंतर्गत सूत्रांचे म्हणणे आहे की फ्रँचायझींना परदेशात लिलाव घेण्यास कोणताही आक्षेप नाही, कारण बहुतेक मालकांचे आधीच आखाती देशांमध्ये व्यावसायिक हितसंबंध आहेत.

## ढाका आंतरराष्ट्रीय विमानतळावर आग, सर्व उड्डाणे थांबवली : कार्गो क्षेत्र जळून खाक, परिसरात विषारी वायू पसरण्याचा धोका



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ ढाका**

बांगलादेशची राजधानी ढाका येथील हजरत शाहजलाल आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कार्गो क्षेत्रात आज दुपारी भीषण आग लागली. आग इतक्या वेगाने पसरली की विमानतळ अधिकाऱ्यांना सर्व उड्डाणे तात्काळ थांबवावी लागली.

विमानतळाच्या गेट क्रमांक ८ जवळील कार्गो गावात दुपारी २:३० च्या सुमारास आग लागली, असे अग्निशमन दलाने सांगितले. आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नाही, परंतु कार्गोचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे.जाड काळ्या धुरामुळे आजूबाजूच्या परिसरातील हवा प्रदूषित झाली. तज्ञांचे म्हणणे आहे की, त्यात विषारी वायू असू शकतात, ज्यामुळे जवळपासच्या लोकांना श्वसनाचे त्रास होऊ शकतात.क्वालालंपूरला जाणारी बाटिक एअरची विमाने आणि मुंबईला जाणारी इंडिगोची विमाने सध्या धावपट्टीवर अडकली आहेत.बँकॉकहून येणारी यूएस-बांगलाची विमाने आणि शारजाहहून येणारी एअर अरेबियाची विमाने ढाकाऐवजी चितगावला वळवण्यात आली आहेत.

इंडिगोची दिल्लीला जाणारी विमाने कोलकात्याला वळवण्यात आली आहेत. कॅथे पॅसिफिकची हाँगकाँगला जाणारी विमाने हवेतच फिरत आहेत आणि सध्या ती उतरू शकत नाहीत.सैदपूर आणि चितगावहून येणारी देशांतर्गत विमाने ढाकामध्ये उतरण्याऐवजी चितगावला परत वळवण्यात आली आहेत.

## 'सरसकट सीबीआय चौकशीचे आदेश देऊ नका' सर्वोच्च न्यायालयाचा अन्य न्यायालयांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ नवी दिल्ली**

न्यायालयांनी सर्रास सीबीआय चौकशीचे आदेश देऊ नये, असे आदेश मर्यादित वेळेस तसेच योग्य ती काळजी घेऊन द्यावेत, असे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी म्हटले आहे. उत्तर प्रदेश विधान परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या भरतीप्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा आरोप असून, त्याची सीबीआय चौकशी करण्याचा अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. जे. के. माहेश्वरी



व न्या. विजय बिष्णोई यांच्या खंडपीठाने रद्द केला. त्यावेळी हे निरीक्षण नोंदवले.

सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, सीबीआय चौकशीचे निर्देश देताना न्यायालयांनी काळजीपूर्वक व मर्यादित स्वरूपात अधिकार वापरले पाहिजेत.

**'सीबीआय चौकशीचा आदेश हा अंतिम पर्याय'**

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, सीबीआय चौकशीसाठीचा आदेश अंतिम पर्याय म्हणूनच वापरण्यात यावा. चौकशी प्रक्रियेची पारदर्शकता धोक्यात आल्याची न्यायालयाने खात्री पटवावी. त्यानंतरच असा आदेश द्यावा.

एखाद्या प्रकरणात समोर आलेले पुरावे व्यवस्थेचे अपयश दाखवितात, उच्चपदस्थ अधिकारी, राजकीयदृष्ट्या प्रभावी व्यक्ती या प्रकरणांत सहभागी असू शकते. स्थानिक पोलिसांच्या भूमिकेबद्दल लोकांच्या मनात शंका निर्माण होते. अशा स्थितीतच सीबीआय चौकशीचा आदेश देण्याचा पर्याय न्यायालयांनी निवडायला हवा. न्यायालयांनी सीबीआयसारख्या विशेष केंद्रीय यंत्रणेवर अनावश्यक भार टाकू नये, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

## महाविकास आघाडी आणि मनसेच्या प्रयत्नांना यश जिल्हाधिकाऱ्यांना मतदार यादीत घोळ तपासण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

महाराष्ट्रातील मतदार यादीत घोळ असल्याचा आरोप करण्यात आल्यापासून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. महाविकास आघाडी आणि मनसेच्या नेत्यांनी सलग दोन दिवस निवडणूक आयोगावर प्रश्नांची सरबत्ती केल्यानंतर अखेर मुख्य निवडणूक आयुक्त चोक्कलिंगम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना मतदार यादीत घोळ तपासण्याचे आदेश दिले आहेत. ही बाब राज्यातील निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी मोठे पाऊल मानले जात आहे.




गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात मतदार यादीतील अनेक त्रुटी आणि घोळ समोर आले आहेत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याचा उल्लेख करत महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये मतदार यादीत घोळ असल्याचे ठळकपणे दाखवले. या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि मनसेचे नेते आयोगाशी भेट घेऊन पुरावे सादर करत होते. या पुराव्यांमध्ये एकाच घरात शेकडो नावे नोंदलेली असल्याचा उल्लेख होता.

नागपूरमध्ये एकाच घराच्या पत्त्यावर २०० मतदार असल्याचे गंभीर आरोप विरोधकांनी केले होते. यासह, जयश्री मेहता या महिलेसाठी दहिसर, चारकोपसह एकूण चार ठिकाणी मतदान नोंदले गेले होते, तर मोहन नंदा बिलवा या महिलेसाठी मतदार यादीत तीन ठिकाणी नाव असल्याचा दावा करण्यात आला होता. या सर्व पुराव्यांनंतर आयोगाचे अधिकारी काही काळ निरुत्तर झाले, पण अखेर जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले गेले आहेत.

संपादकीय ......

# सर्वे सन्तु निरामयाः

आज धनत्रयोदशी म्हणजेच आयुर्वेदाचे आद्य प्रवर्तक असलेल्या भगवान धन्वंतरींची जयंती. प्राचीन भारतीय संस्कृतीने जगाला आरोग्याविषयी दिलेल्या अमूल्य देणग्यांमध्ये चार उपवेदांपैकी एक असलेला आयुर्वेद तसेच योगविद्येचा समावेश होतो. केवळ एक उपचार पद्धती न राहता जीवनशैलीचे शास्त्र म्हणून आयुर्वेदाने गेल्या काही दशकांत भारताच्या सीमा ओलांडून जगभरातील लोकांमध्ये विश्वास आणि लोकप्रियता मिळवली आहे. 'आरोग्यम् धनसंपदा'या तत्त्वावर आधारित हे प्राचीन ज्ञान आता आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर खरे उतरत आहे.

आयुर्वेदाचा प्रसार जगात प्रामुख्याने तीन स्तरांवर झाला आहे. शैक्षणिक, वैद्यकीय (क्लिनिकल) आणि व्यावसायिक. उत्तर अमेरिकेत आयुर्वेद 'पूरक आणि पर्यायी औषध' म्हणून लोकप्रिय आहे. अनेक विद्यापीठे आणि संस्थांमध्ये आयुर्वेदाचे डिप्लोमा आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. विशेषतः कॅलिफोर्निया आणि न्यूयॉर्कमध्ये अनेक आयुर्वेदिक शाळा स्थापन झाल्या आहेत. अमेरिकेतील वेलनेस उद्योगात (उदा. योग आणि स्पा) आयुर्वेदिक उपचार, मसाज (उदा. अभ्यंग), पंचकर्म आणि डिटॉक्स उपचारांची मागणी वाढली आहे. कर्करोग आणि ऑटोइम्यून रोगांसारख्या गंभीर आजारांवर पारंपरिक उपचारांसोबत आयुर्वेदिक उपचार घेण्याचा ट्रेंड वाढत आहे. युरोपमध्येही आयुर्वेदाला मोठी प्रतिष्ठा मिळत आहे, खासकरून जर्मनीमध्ये. जर्मनी हा युरोपमधील आयुर्वेदाचा केंद्रबिंदू मानला जातो. येथे अनेक आयुर्वेदिक क्लिनिक्स आणि पंचकर्म केंद्रे आहेत. जर्मनीमध्ये आयुर्वेदिक उत्पादनांची आणि उपचारांची मागणी सर्वाधिक आहे. अनेक युरोपीय देशांमध्ये (उदा. स्वित्झर्लंड) आयुर्वेदिक वैद्यकीय उपचार आणि उत्पादनांना मान्यता मिळवण्यासाठी नियम शिथिल केले जात आहेत.बिटनमध्ये योग आणि आयुर्वेद एकत्र शिकवणाऱ्या संस्था कार्यरत आहेत. युरोपमधील लोकांना आयुर्वेदिक उपचारांचे प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय वैद्यांना निमंत्रित केले जाते. जपानमध्ये हर्बल आणि नैसर्गिक औषधांवर मोठ्या प्रमाणावर संशोधन केले जाते. आयुर्वेदिक औषधी वनस्पती, विशेषतः त्यांच्या बायोक्टिव्ह संयुगांवर सखोल वैज्ञानिक अभ्यास केला जात आहे. ऑस्ट्रेलियामध्ये 'ट्रॅडिशनल मेडिसिन' श्रेणीअंतर्गत आयुर्वेदिक उत्पादनांना बाजारात आणण्यासाठी कठोर नियम आहेत, ज्यामुळे उत्पादनांची गुणवत्ता जपली जाते. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये योगामुळे आयुर्वेदाच्या जीवनशैलीविषयक दृष्टिकोनाचा प्रसार अधिक वेगाने झाला आहे. आफ्रिका तसेच आग्नेय आशियातही आयुर्वेदाचा मोठाच प्रसार झालेला पाहायला मिळतो.

आयुर्वेद हा केवळ भारताचा वारसा नसून, संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी एक अमूल्य ठेवा आहे. वैज्ञानिक संशोधनाच्या आधारे आणि योग्य नियमनासह या प्राचीन जीवनशास्त्राचा प्रकाश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचत आहे, ज्यामुळे 'सर्वे सन्तु निरामयाः' (सर्वजण निरोगी असोत) ही भारतीय प्रार्थना साकार होत आहे.

# अमरावती जिल्ह्यात चिकुनगुनियाचा कहर ; नऊ महिन्यांत २८२ रुग्ण

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१८अमरावती–** जिल्ह्यात चिकुनगुनियाचा प्रादुर्भाव वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा या आजाराचे प्रमाण वाढले असून, जानेवारी ते सप्टेंबरदरम्यान चिकुनगुनियाचे तब्बल २८२ रुग्ण आढळले आहेत. डेंग्यू रुग्णांची संख्यादेखील ३१० इतकी पोहोचली आहे; परंतु गतवर्षीच्या तुलनेत ही संख्या कमी असल्याचे जिल्हा हिवताप विभागाचे म्हणणे आहे.



पावसाळ्याच्या दिवसांमध्ये वातावरणात होणाऱ्या बदलामुळे कीटकजन्य आजारांचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणावर वाढते. त्यामुळे हे आजार थांबवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाते. यात आरोग्य विभागाकडून फॉगिंग, लार्वानाशक फवारणी, साचलेल्या पाण्यामध्ये गप्पी मासे सोडण्याची मोहीम राबविण्यात येते. तसेच नागरिकांनी घराच्या परिसरात साचलेले पाणी त्वरित काढून टाकावे, कुलर, फुलदाणी, टाक्या, बादल्या यामध्ये डासांची पैदास होऊ नये, यासंदर्भात जनजागृती केली जाते; परंतु तरीही यंदा चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे.

जिल्ह्यात नऊ महिन्यांत तब्बल २८२ रुग्ण आढळले आहेत. त्यात महापालिका क्षेत्रात ६३ तर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात २१९ रुग्ण आढळले. त्याचबरोबर डेंग्यूच्या ३१० रुग्णांपैकी २२९ हे ग्रामीण भागात तर मनपा क्षेत्रातील ८१ रुग्ण आहेत.

> नऊ महिन्यांत जिल्ह्यात डेंग्यूचे ३१० रुग्ण असले, तरी गतवर्षीच्या तुलनेत ही संख्या यंदा घटली आहे. परंतु, चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येत वाढ झाली असून, ती २८२ इतकी झाली आहे. कीटकजन्य आजार रोखण्यासाठी हिवताप विभागाकडून सर्व प्रयत्न केले जातात.
>
> – **डॉ. शरद जोगी,** जिल्हा हिवताप अधिकारी.

**वेळीच घ्या काळजी**

चिकुनगुनिया व डेंग्यू या दोन्ही आजारांमध्ये उच्च ताप, अंगदुखी, सांधेदुखी, डोळ्यांच्या मागे वेदना, त्वचेवर पुरळ अशी लक्षणे दिसतात. वेळेवर उपचार न घेतल्यास रक्तपेशींची संख्या घटू शकते आणि रुग्ण गंभीर होऊ शकतो. त्यामुळे लक्षणे दिसताच वेळीच रुग्णालयात जाणे गरजेचे आहे.

**मलेरियाचे रुग्ण वाढले**

चिकुनगुनिया, डेंग्यू आजारां बरोबरच यंदा मलेरियाच्या रुग्ण संख्येतही वाढ झाली आहे. जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यांत १३६ मलेरियाचे रुग्ण आढळले. ग्रामीण भागात १२६ आणि शहरात १० रुग्ण आढळले. या रुग्णांमध्ये मुंबईतून परतलेल्या रुग्णांची संख्या अधिक आहे.

# उद्याला नांदगाव पेठमध्ये ग्रामस्वच्छता अभियान

## ग्रामपंचायत व श्रीराम संस्थान चा पुढाकार

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत राबविजर उपक्रम**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८नांदगाव पेठ**

ग्रामपंचायत नांदगाव पेठ व श्रीराम संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत रविवारी दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता ग्रामस्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील स्वच्छता राखण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करण्याच्या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



ग्रामपंचायतच्या वतीने दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी ग्रामस्वच्छता अभियान घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या माध्यमातून माझे गाव, स्वच्छ गाव ही संकल्पना वास्तवात आणण्याचा प्रयत्न आहे. अभियानाचा शुभारंभ ग्रामपंचायत प्रांगणातून करण्यात येणार असून, यावेळी गावातील नागरिक, महिला बचतगट सदस्य, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. श्रीराम संस्थानच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत होणाऱ्या या अभियानादरम्यान रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर आदींची स्वच्छता करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांना प्लास्टिकविरहित गाव निर्माण करण्याचा संदेशही देण्यात येणार आहे.प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी हे अभियान राबविण्यात येणार असून या रविवारी सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सरपंच कविता डांगे व ग्रामपंचायत अधिकारी हर्षदा बोंडे यांनीकेले आहे.

# ज्वारीपासून हुरडा, लाह्या व पापड बनवायचे असतील तर करा 'ह्या' तीन वाणांची पेरणी

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीने महाराष्ट्रातील रब्बीज्वारी पिकविणाऱ्या निरनिराळ्या भागांकरीता जमिनीच्या प्रतीनुसार योग्य असे अधिक उत्पादन देणारे सुधारीत वाण विकसीत करुन त्यांची शिफारस केलेली आहे.

ज्वारीचे प्रक्रियायुक्त पदार्थ बनविण्यासाठी उपयुक्त वाण

**१) फुले मधुर (हुरडा)**

ही जात ज्वारीच्या हुरड्यासाठी मध्यम ते भारी जमिनीकरीता विकसीत करण्यात आली आहे. या जातीचा हुरडा ९५ ते १०० दिवसात तयार होतो. या जातीचे हुरडा उत्पादन ३० ते ३५ क्विंटल प्रति हेक्टर मिळते.

कडब्याचे उत्पादन ६५ ते ७० क्विंटल प्रति हेक्टर मिळते. हुरडा चवीला उत्कष्ट.

खोडमाशी, खोडकिडा व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम.

**२) फुले पंचमी (लाह्या)**

ही जात ज्वारीच्या लह्यांसाठी मध्यम ते भारी जमिनीकरीता विकसीत करण्यात आली आहे. ही जात ११५ ते १२० दिवसात तयार होते.




या जातीपासून पांढऱ्या शुभ्र, पुर्ण फुललेल्या लाह्या तयार होतात. या वाणामध्ये लाह्या तयार होण्याचे प्रमाण ८७.४ टक्के इतके आहे.

या वाणापासून धान्य उत्पादन १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर मिळते. कडब्याचे उत्पादन ४० ते ४५ क्विंटल प्रति हेक्टर मिळते. ही जात खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम आहे.

**३) फुले रोहीणी (पापड)**

ही जात ज्वारीच्या पापडांसाठी मध्यम ते भारी जमिनीकरीता विकसीत करण्यात आली आहे.

ही जात ११५ ते १२० दिवसात तयार होते.

पापडाचा रंग लालसर विटकरी असून खाण्यासाठी कुरकुरीत व चवदार आहे.

खोडमाशी, खोडकिडा व मावा या किडीस तसेच खडखड्या रोगास प्रतिकारक्षम.

पाण्याचा ताण सहन करते.

या वाणापासून धान्य उत्पादन १८ ते २० क्विंटल प्रति हेक्टर मिळते.

कडब्याचे उत्पादन ४५ ते ५० क्विंटल प्रति हेक्टर मिळते.

हा वाण पश्चिम महाराष्ट्राकरिता पापडासाठी शिफारस केला आहे.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




# आरोग्यासाठी उपयुक्त ठरेल हे पेयं, रोज सकाळी चार चमचे, त्वचा ठेवते सुंदर

**दि. १८विदर्भ प्रजासत्ताक**

गाजराचा हा ज्यूस केवळ चवीला मस्त नसून आरोग्यासाठीही अत्यंत लाभदायक आहे. रोज सकाळी रिकाम्या पोटी हा ज्यूस घेतल्यास शरीराला ऊर्जा, ताजेपणा आणि नैसर्गिक चमक मिळते. हे पेय नैसर्गिक डिटॉक्स ड्रिंक आहे. हे शरीर शुद्ध ठेवते, त्वचा सुंदर ठेवते आणि दिवसाची सुरुवात मस्त करते. या ज्यूसमध्ये पाणी घातल्यामुळे तो हलका आणि पचायला सोपा होतो.



चवीच्या दृष्टीने हा ज्यूस थोडासा गोडसर, थोडासा आंबट आणि आल्यामुळे जरा तिखटसर लागतो. त्यामुळे आरोग्यासोबतच स्वादाची मजाही मिळते. यात कॅलरी कमी आणि पोषणसत्त्वे जास्त असल्याने वजन नियंत्रित ठेवण्यासाठीही हा उत्तम पर्याय आहे.

गाजरात बीटा-कॅरोटीन, जीवनसत्त्व ए आणि अँण्टी ऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. हे घटक डोळ्यांच्या आरोग्यासाठी उत्तम असून त्वचा मुलायम आणि चमकदार ठेवतात. संत्र्यात भरपूर जीवनसत्त्व सी असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. सर्दी, खोकल्यासारख्या त्रासांपासून संरक्षण मिळते. लिंबू शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकते आणि पचन सुधारते. त्याचबरोबर आलं शरीरातील सूज कमी करते, रक्ताभिसरण सुधारते आणि थंडीच्या दिवसांत शरीराला उब देते.

# महाराष्ट्र सरकारने गौमातेला दिलेला राज्य मातेचा दर्जा कागदावरच

## स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८उल्हास नगर–** कॅम्प नं-५, येथील साई वसणशाह दरबारामध्ये सतगुरू साईं वसणघोट यांच्या १३१ व्या जन्मोमहोत्सवानिमित्त ज्योतिर्मठ बद्रीनाथ पीठाचे जगद्गुरु शंकराचार्य, स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांचे सत्संग व प्रवचन गुरुवारी झाले. यावेळी राज्य शासनने गायीला दिलेल्या राज्य मातेचा दर्जाची अंमलबजावनी झाली नसल्याने ते कागदावर असल्याचे मत शंकराचार्य यांनी व्यक्त केले.

उल्हासनगर कॅम्प नं-५ येथील साई वसणशाह दरबारामध्ये सतगुरू साईं वसणघोट यांची १३१ वी जन्मोमहोत्सव साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त ज्योतिर्मठ बद्रीनाथ पीठाचे जगद्गुरु शंकराचार्य, स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांचे सत्संग व प्रवचन गुरुवारी ठेवण्यात आले होते. प्रवचन व सत्संगाला सामाजिक संस्था, संत, पंचायतीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मसन्द सेवाश्रम रायपूरचे पीठाधीश साईं जलकुमार मसन्द साहिब यांच्या पुढाकाराने आणि साईं कालीराम साहिब यांच्या उपस्थितीत प्रवचन व सत्संगाचा कार्यक्रम गुरुवारी रात्री पार पडला. शंकराचार्यांनी सिंधमधील नागरिकांची जबाबदारी ज्योतिर्मठांतर्गत निश्चित केली असल्याने, ते सिंधी समाजातील संतांना शंकराचार्यांशी जोडण्याचे अभियानही चालवत आहेत.



महाराष्ट्र सरकारने गौमातेला राज्य माताचा दर्जा दिला, परंतु या संदर्भात अद्याप अधिकृत अंमलबजावनी केली नाही. जोपर्यंत अंमलबजावनी होत नाही, तोपर्यंत राज्या गोमाता दर्जा कागदावर असल्याचे शंकराचार्य म्हणाले. गाय मातेला 'पशु' (जनावरांच्या) श्रेणीतून काढून 'माता' आणि 'मनुष्य' च्या श्रेणीत आणावे लागेल. जे गौमातेची हत्या करतात. त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, राज्य सरकारने गोमाता दर्जाची अंमलबजावनी करावी, तसेच गौमातेला 'राष्ट्रमाता' घोषित करण्यासाठी 'गौ संसद' भारतीय संसदेच्या समांतर कार्य करेल. यासाठी भारतातील बहुसंख्य लोकांनी गायीला आपली माता मानले पाहिजे, आपोआप ती 'राष्ट्रमाता' बनेल. असेही शंकराचार्य म्हणाले.

# महिला विश्वचषकातील भारत-पाक सामन्याने मोडला प्रेक्षकसंख्येचा विक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ नवी दिल्ली**

सध्या सुरू असलेल्या महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याने प्रेक्षकांचा एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. आयसीसीच्या माहितीनुसार, ५ ऑक्टोबर रोजी कोलंबोमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्याला २.८४ कोटी प्रेक्षक मिळाले आणि एकूण १८७ कोटी मिनिटांचा वॉच टाईम (पाहण्याचा वेळ) नोंदवला गेला. हा सामना आतापर्यंतचा सर्वाधिक पाहिला गेलेला महिला आंतरराष्ट्रीय सामना ठरला आहे.

**सर्वाधिक पाहिला गेलेला सामना**

आयसीसीने स्पष्ट केले आहे की, हा सामना प्रेक्षकांच्या संख्येच्या दृष्टीने सर्वोत्तम होता. तसेच, विश्वचषक लीग टप्प्याच्या पहिल्या सहामाहीत डिजिटल टीव्ही प्लॅटफॉर्मवर विक्रमी संख्या पाहायला मिळाली. कोलंबो येथे झालेल्या या सामन्यात भारताने पाकिस्तानचा ८८ धावांनी पराभव केला होता.

**आकडेवारीतील मोठी वाढ**

टीव्हीवरील प्रेक्षक संख्या भारत-पाकिस्तान सामन्याने महिला विश्वचषक इतिहासात लीग स्टेजमधील सर्वाधिक टीव्ही प्रेक्षकसंख्या गाठली. श्रीलंका, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका विरुद्ध भारताच्या सामन्यांसह पहिले ११ सामने एकूण ७२ दशलक्ष (७.२ कोटी) प्रेक्षकांनी पाहिले. २०२२ च्या विश्वचषकाच्या तुलनेत टीव्ही प्रेक्षकांच्या संख्येत १६६ टक्के वाढ झाली आहे. या ११ सामन्यांमुळे एकूण ६.३ अब्ज मिनिटे पाहण्याचा वेळ निर्माण झाला.



डिजिटल प्लॅटफॉर्मवरील प्रेक्षक संख्या आयसीसी आणि जिओहॉटस्टारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, स्पर्धेच्या पहिल्या १३ सामन्यांना डिजिटल प्लॅटफॉर्मवर आधीच ६ कोटी प्रेक्षक मिळाले आहेत. २०२२ च्या आवृत्तीच्या तुलनेत ही पाच पटीने मोठी वाढ आहे. पहिल्या १३ सामन्यांमध्ये एकूण ७ अब्ज मिनिटे पाहण्याचा वेळ नोंदवला गेला, जो मागील स्पर्धेपेक्षा १२ पट जास्त आहे. आयसीसीच्या अहवालानुसार, १२ ऑक्टोबर रोजी भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्याला जिओहॉटस्टारवर एकाच वेळी ४८ लाख प्रेक्षक होते. हा आकडा महिला क्रिकेटमध्ये एक नवा विक्रम आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १८ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# भाऊसाहेबांच्या जन्मगावी पापळ येथे मिळाले कृषी महाविद्यालय

**श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मागणीला मोठे यश**

## शिव परिवाराच्या स्वप्नाची पूर्तता -- हर्षवर्धन देशमुख



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** शिवाजी शिक्षण संस्थेची महत्त्वाची मागणी राज्य सरकारने आज पूर्ण केली असून खऱ्या अर्थाने शिव परिवाराच्या स्वप्नाची ही पूर्तता आहे. भाऊसाहेबांच्या जन्मगावी म्हणजे पापळ येथे शासनाने आज अध्यादेश काढून कृषी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता दिली.ही श्री शिवाजी शिक्षण संस्थेसाठी मोठी उपलब्धी आहे. खऱ्या अर्थाने श्री शिवाजी शिक्षण संस्थेला आज मोठे यश प्राप्त झाले असून महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार मानत असल्याची प्रतिक्रिया श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी व्यक्त केली.महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन,दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभागाच्या वतीने आज जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत श्री शिवाजी शिक्षण संस्थेस पापळ तालुका नांदगाव खंडेश्वर येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याची विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात आली आहे.शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जन्म गावी म्हणजे पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरू व्हावे यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्न करण्यात येत होते. अखेर श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या नेतृत्वातील कार्यकारिणीला हे यश मिळाले. शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयामध्ये काही अटी व शर्तीवर ही मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सत्र २०२५२०२६ पासून ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या अटीवर हे कृषी महाविद्यालय कायमस्वरूपी,विनाअनुदानित तत्त्वावर सुरू करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

**महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार**–श्री.शिवाजी शिक्षण संस्थेच्या मागणीची दखल घेत पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याची मान्यता प्रदान केल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी महाराष्ट्र शासनाचे विशेष आभार मानले आहे. उल्लेखनीय म्हणजे गेल्या वर्षी भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पापळ येथे लवकरच कृषी महाविद्यालय सुरू करू असे आश्वासन दिले होते. आज ही मागणी पूर्ण झाल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या संपूर्ण कार्यकारिणीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. यासोबतच या मागणीच्या पूर्तते करिता ज्यांचे विशेष सहकार्य लाभले असे आ. प्रताप अडसड व आ. रणधीर सावरकर यांचे देखील संस्थेच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

**पेढे भरून व्यक्त केला आनंद**– दरम्यान श्री शिवाजी शिक्षण संस्थेला पापळ येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याची परवानगी मिळाल्याने श्री शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये आज आनंद व्यक्त करण्यात आला. संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य ,सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकमेकांचे अभिनंदन करत पेढे भरून आनंद साजरा केला.श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयात आज आनंद उत्सव साजरा करण्यात आला यावेळी झालेल्या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष भैय्यासाहेब पाटील पुसदेकर , कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, सचिव प्राचार्य वि.गो. ठाकरे, संस्थेच्या अधीक्षक भावना गावंडे, व सर्व कर्मचारी उपस्थित होते. श्री शिवाजी शिक्षण संस्थेला मिळालेल्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# राज्यातील १,७३४ जिल्हा परिषद शाळांना लागणार कायमचे टाळे!

## 'गाव तेथे शाळा' धोरणाला पूर्णविराम?




आरटीई कायद्यानुसार एक किलोमीटरच्या आतमध्ये प्राथमिक शाळा व तीन किलोमीटरच्या आतमध्ये माध्यमिक शाळा म्हणजे प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण हे स्वगावातच मिळाले पाहिजे. गोरगरीब, शेतकरी तसेच मुलींना वंचित ठेवण्याचा शासनाचा डाव आहे. वाहन भत्ता ही एक पोकळ घोषणा आहे.

– **राजेश सावरकर,** राज्य प्रतिनिधी, प्राथमिक शिक्षक समिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–**

राज्य शासनाकडून कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणार नसल्याचे वारंवार सांगितले जात असताना १ ते ५ पटसंख्या व एकाच परिसरातील जिल्हा परिषद शाळांचे एकत्रीकरण करून समूह शाळा करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला. या निर्णयामुळे राज्यातील १,७३४ शाळांना कायमचे टाळे लागणार असल्याने हजारो विद्यार्थ्यांवर प्राथमिक शिक्षणासाठी पायपीट करण्याची नामुष्की ओढवणार आहे.

शाळा बंद होणार असल्याने अतिरिक्त शिक्षकांचे इतरत्र समायोजन होणार असल्याने शिक्षकांनाही गैरसोयींचा सामना करावा लागणार आहे. केंद्र सरकारने मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा २००९ साली अमलात आणून 'गाव तेथे शाळा' हे धोरण राबवले.

गाव, वाडी, वस्ती, तांडा येथील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. मात्र राज्यात १ ते ५ पटसंख्येच्या १,७३४, ६ ते १० पटसंख्या असलेल्या ३,१३७ तर १० ते २० पटसंख्या असलेल्या ९,९१२ शाळा आहेत.

या शाळांतील विद्यार्थी संख्या कमी असल्याने शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. २० पटसंख्यापर्यंतच्या शाळा बंद करून तेथील विद्यार्थ्यांना लगतच्या शाळेत प्रवेशित करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र या निर्णयाला विरोध झाल्याने मागील तीन वर्षापासून शाळा बंद करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली होती.

कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून या शाळांचे समूह शाळांमध्ये रूपांतर केल्या जाणार आहे. शाळा बंद केल्यामुळे समावेश झालेल्या विद्यार्थ्यांना वाहतूक भत्ता दरमहा ६०० रुपये दिले जाणार आहेत. यामुळे बंद शाळांचा 'यू-डायस' क्रमांकही रद्द होईल.

# सावधान! दिवाळीवर पावसाचे सावट, ३ दिवस 'यलो अलर्ट'

## अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १८ अमरावती–** अरबी समुद्रात लक्षद्वीपजवळ शनिवारी (दि. १८) कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. या क्षेत्राच्या प्रभावामुळे कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यात पुढील तीन दिवसांत वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. त्यामुळे दिवाळी सणावर पावसाचे सावट पसरले आहे.लक्षद्वीपजवळ केरळ व किनारपट्टीजवळ कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार असून, त्याची तीव्रता वाढत जाणार आहे. हे क्षेत्र उत्तर-पश्चिमेकडे प्रवास करण्याचा अंदाज आहे. याच्या प्रभावामुळे केरळ, तामिळनाडू तसेच पुद्दुचेरीमध्ये पुढील तीन दिवस जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे; तर कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' आहे. सोमवारी (दि. २०) मराठवाड्यात 'यलो अलर्ट' आहे.

**मान्सूनचा निरोप–** नैर्ऋत्य मोसमी पावसाने गुरुवारी देशाचा निरोप घेतला. यावर्षी पावसाने भरभरून पडला आहे. ईशान्य मोसमी पाऊस लवकरच दक्षिणेकडे दाखल होणार आहे.

**ऑक्टोबरमध्ये पाऊस–** राज्यात २१ ऑक्टोबरपर्यंत पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे दिवाळी सणावर पावसाचे सावट पसरले आहे. २३ ते ३० ऑक्टोबरच्या आठवड्यात विदर्भ वगळता राज्यात पावसाची शक्यता आहे.

# सणासुदीत 'खासगी बस'कडून अवाजवी भाडेवाढ?

## 'एसटी'च्या तुलनेत दीडपट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती–**

दिवाळी सणानिमित्त बाहेर गावी जाणाऱ्या प्रवाशांची प्रचंड गर्दी उसळत असते. या पार्श्वभूमीवर खासगी बसमालक अवाजवी भाडे आकारुन प्रवाशांची आर्थिक लूट करतात. हे टाळण्यासाठी खासगी बसमालकांवर कारवाईची मोहीम प्रादेशिक परिवहन विभागाने सुरू केली. या प्रकाराविरोधात तक्रार दिल्यास थेट संबंधित बसमालकावर गंभीर कारवाई होणार आहे.

वर्षातील सर्वात मोठा सण म्हणून दिवाळी ओळखली जाते. दिवाळी सणात प्रत्येकाला आपल्या घराची ओढ लागते. त्यातून बाहेरगावी असणारे प्रत्येक जण आपल्या गावाच्या दिशेने रवाना होतात. दिवाळी सणानिमित्त व त्यानंतर सुट्टीच्या काळात देखील मोठ्या प्रमाणात नागरिक प्रवास करतात. आपल्या कुटुंबियांना भेटण्यासह सणानिमित्त आपल्या गावी जाण्यासाठी खासगी मोटारींनी प्रवास करीत असतात. या गर्दीचा फायदा घेण्याचा प्रकार खाजगी बस मालकांकडून सर्रासपणे होतो. खासगी प्रवाशी बस मालक आणि ऑनलाईन तिकिट नोंदणी करणाऱ्यांकडून तिकीट दरांमध्ये प्रचंड वाढ केली जाते. अवाजवी दर आकारले जातात. यामुळे नागरिकांचे आर्थिक लूट होत आहे.

नागरिकांना अशा वाढीव दरांमुळे प्रवास परवडत नाही. त्यांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. या सर्व प्रकारावर परिवहन विभागाने कारवाईची मोहीम सुरू केली आहे. ३ नोव्हेंबरपर्यंत ही मोहीम राबविण्यात येणार आहे. खासगी प्रवासी बसगाड्यांची तपासणी व भाडे आकारणी आदी बाबी तपासण्यात येणार असल्याचे परिवहन विभागाकडून सांगण्यात आले.

खासगी बसचालकांनी शासन निर्णयानुसार बसचे भाडे हे राज्य परिवहन बस भाड्यापेक्षा दीड पटीपेक्षा अधिक आकारु शकत नाही. तपासणीमध्ये असे आढळून आल्यास कारवाई करण्यात येणार आहे. वाहनांची सखोल तपासणी करण्यात येऊन मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत असलेल्या नियमानुसार वाहनावर कडक कारवाई करण्यात येईल, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी सांगितले.

सणासुदीच्या काळात शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे खासगी बसचे भाडे हे राज्य मार्ग परिवहन बसच्या दीड पटपर्यंत वाढवण्याची बस मालकांना परवानगी आहे. खासगी बस मालक प्रवाशांकडून राज्य परिवहन बसच्या भाड्याच्या दीड पटीपेक्षा अधिक भाडे घेत असेल तर प्रवाशांनी घेतलेल्या भाड्याच्या रकमेच्या तिकीटाची मागणी करावी, त्याआधारे परिवहन कार्यालयाच्या ई-मेल आयडी वृीं.३०-हर्सीं.ळप वर तक्रार करता येईल. त्या खासगी बसेसवर मोटार वाहन कायदा व त्या अंतर्गत असलेल्या नियमांनुसार कारवाई करण्यात येईल.

# संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला सेवा गौरव पुरस्कार

## शासनातर्फे पुण्यात विश्वस्तांचा गौरव




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

शासनाच्या आरोग्य विभागातर्फे उत्तम कार्यासाठी देण्यात येणार्या वंदनीय बाळासाहेब ठाकरे जन आरोग्य सेवा गौरव पुरस्काराने अमरावती येथील श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला गौरविण्यात आले आहे.

पुण्यातील पिंपरी चिंचवड येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात शुक्रवारी सकाळी झालेल्या कार्यक्रमात सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार दत्तात्रय भरणे, पद्मश्री पोपटराव पवार, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्याहस्ते श्री संत अच्युत महाराज हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, सचिव सागर पासेबंद, विश्वस्त मनोज वाडेकर तसेच गुणवंत डहाणे, राजेंद्र दिगंबर, धनंजय मेटे, दत्ता खंदारे यांनी हा पुरस्कार स्विकारला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने आरोग्य विभागातील अधिकारी व पुरस्कार प्राप्त अन्य संस्थेचे पदाधिकारी आणि व्यक्ती हजर होते. नागरिकांची देखील उपस्थिती होती. हा सन्मान संस्थेचे सर्व कार्यकर्ते, डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक ठरला आहे.

राज्याच्या आरोग्य विभागाच्या राज्य आरोग्य हमी सोसायटी मार्फत राबविण्यात येत असलेल्या एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये श्री संत अच्युत महाराज हॉर्ट हॉस्पिटल अंगीकृत आहे.

सदर योजनेतून लाभार्थ्यांवर सन २०२४-२०२५ मध्ये झालेल्या शस्त्रक्रिया/उपचार विचारात घेऊन खाजगी अंगीकृत रुग्णालये या वर्गवारीत हार्ट हॉस्पिटलची निवड उपरोक्त पुरस्कारासाठी करण्यात आली होती. हॉस्पिटलला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संत अच्युत महाराज परिवारामध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# सक्करसाथ, सराफा परिसरात मनपाची मोठी कारवाई - दोन गोडाऊन सील, २१५० किलो प्रतिबंधित प्लास्टिक आणि ३ ट्रक माल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** अमरावती महानगरपालिकेतर्फे शहरात स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि प्लास्टिक बंदी मोहिमेला गती देत महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १६ ऑक्टोंबर व दिनांक १७ ऑक्टोंबर, २०२५ सक्करसाथ आणि सराफा परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्ती मोहीम राबविण्यात आली. मनपाच्या प्लास्टिक बंदी अंमलबजावणी पथकाने सायंकाळपासून उशिरापर्यंत चालविलेल्या या कारवाईत प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा व वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान मनपाच्या पथकाने दोन मोठी गोडाऊन सील करत २१५० किलो प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य आणि तब्बल तीन ट्रक माल जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये प्लास्टिक पिशव्या, कप, प्लेट्स, थर्माकोल वस्तू, प्लास्टिक कंटेनर आणि डिस्पोजेबल सामग्रीचा मोठा साठा आढळून आला. सर्व जप्त सामग्रीची नोंद घेऊन पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ही मोहीम अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या उपस्थितीत अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रभावीपणे पार पडली.

अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी या वेळी सांगितले की, मनपा प्रशासनाकडून प्लास्टिक बंदीबाबत सातत्याने जनजागृती केली जात असतानाही काही व्यापारी नियमांचे उल्लंघन करीत आहेत. अशा व्यापाऱ्यांवर पुढेही मनपा कठोर कारवाई करणार आहे. हे अभियान केवळ नियमभंग थांबविण्यापुरते नसून पर्यावरण संवर्धनासाठी आवश्यक आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, अमरावती शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. प्लास्टिक बंदी ही फक्त कायदेशीर बाब नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी अत्यावश्यक पाऊल आहे. मनपाच्या प्रयत्नांबरोबर नागरिकांचाही सक्रिय सहभाग आवश्यक आहे. सर्वांनीच प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर थांबवून कापडी व पेपरच्या पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन देखील या वेळी करण्यात आले. या मोहिमेमुळे मनपा प्रशासनाने पुन्हा एकदा प्लास्टिक बंदीबाबतचा आपला कटाक्ष स्पष्ट केला आहे. स्वच्छ, हरित आणि प्लास्टिकमुक्त अमरावतीसाठी ही कारवाई ठराविक पातळीवर नवा आदर्श निर्माण करणारी ठरली आहे.-

# एमपीएससी २०२६ - विविध परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

## उमेदवार तयारीला: स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांना आता परीक्षेनुसार करता येणार नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

एमपीएससीच्या २०२५ मधील काहीमहत्त्वाच्या परीक्षा अजून बाकीआहेत. असे असतानाच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांना दिलासा देणारी बाब आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने२०२६ मधील विविध परीक्षांचेसंभाव्य वेळापत्रक जाहीर केलेआहे. यामुळे उमेदवारांनापरीक्षेनुसार नियोजन करण्यासाठी आता



दिलासा मिळाला आहे.

राज्यभरातून विविध शाखांचेविद्यार्थी मोठ्या प्रमाणात स्पर्धापरीक्षेतून करिअरची संधी मिळवूइच्छितात. प्रशासकीय सेवेत जातायावे, यासाठी महाराष्ट्र लोकसेवाआयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्याविविध परीक्षा देतात. उमेदवारांनापरीक्षेची तयारी चांगल्या पद्धतीनेकरता यावी, यासाठी नियोजनदेखील चांगले असावे. या हेतूनेआयोगाने २०२६ मध्ये होणाऱ्यागट क, गट ब यासह कृषी,अभियांत्रिकी आणि मुख्य परीक्षा,संयुक्त परीक्षांचे वेळापत्रकजाहीर केले आहे. यावेळापत्रकानुसार राज्यसेवा मुख्यपरीक्षा २०२५ ही २९ मार्च २०२६ला घेण्यात येणार आहे. वनसेवामुख्य परीक्षा गट अ ही ५ मे २०२६मध्ये घेण्यात येणार आहे. गेल्याकाही वर्षांत परीक्षांचे वेळापत्रकजाहीर झाल्यानंतरही अडचणीआल्याने वेळापत्रकात बदलकेला होता. तसेचअतिवृष्टीमुळे ही ऑक्टोबरमध्येहोणाऱ्या परीक्षेची तारीखबदलण्यात आली. आता मात्रविद्यार्थ्यांना नियोजन करण्यासाठी२०२६ चे संभाव्य वेळापत्रकआयोगाने जाहीर केल्याचेसूचनापत्रात म्हटले आहे.

### या वेळी उमेदवारांना नियोजनासाठी मिळणार पुरेसा वेळ

दरवर्षी नोव्हेंबर अथवा डिसेंबरमध्ये पुढील वेळापत्रक जाहीर होते, परंतु यंदा ऑक्टोबर२०२६ मध्ये होणाऱ्या विविध परीक्षांचे वेळापत्रक आयोगाने जाहीर केले. यामुळे उमेदवारांनापुरेसा वेळ पुढील परीक्षांच्या तयारीसाठी मिळेल. त्याचे नियोजनही करता येईल. **– महेश घरबुडे,** अध्यक्ष, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असोसिएशन.

### असे आहे विविध परीक्षांचे जाहीर संभाव्य वेळापत्रक

राज्यसेवा मुख्यपरीक्षा २०२५ : २९ मार्च२०२६, निकाल ऑगस्ट२०२६ ५ एप्रिल पेपर ३, १८एप्रिल सामान्य अध्ययन १,२०२६ १९ एप्रिल २०२६,सामान्य अध्ययन ३, २६एप्रिल वैकल्पिक पेपर,निकाल ऑगस्टमध्ये

महाराष्ट्र वनसेवामुख्य परीक्षा २०२५ : ५ ते७ मे २०२६

स्थापत्य अभियांत्रिकीसेवा मुख्य परीक्षा २०२५: ७ ते ९ मे २०२६

कृषी सेवा मुख्य २०२५: १६ मे २०२६

गट ब सेवा संयुक्तमुख्य परीक्षा २०२५ : १७मे २०२६, निकालसप्टेंबरमध्ये

गट क सेवा संयुक्तपूर्व परीक्षा : ४ जानेवारी२०२६

अन्न व औषधप्रशासकीय सेवा मुख्यपरीक्षा : २१ नोव्हेंबर २०२६

वनसेवा मुख्य परीक्षा२०२६ : २६ डिसेंबर २०२६

गट ब संयुक्त पूर्वपरीक्षा : १४ जून, निकालऑक्टोबरमध्ये

गट क संयुक्त पूर्वपरीक्षा : १२ जुलै,नोव्हेंबरमध्ये निकाल

गट क मधील संयुक्तसेवा मुख्य परीक्षा : १३डिसेंबर, निकाल एप्रिल२०२७.

# ध्वनी मर्यादेच्या चाचणीत सर्व २३ प्रकारचे फटाके पास

## प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून बॉम्ब, रॉकेट, फटाक्यांच्या लडींच्या आवाजाची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८संभाजी नगर–** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेकेलेल्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवरशुक्रवारी (१७ सप्टेंबर) झालानीटूल्सच्या चिकलठाणा येथीलमैदानावर फटाक्यांच्या केलेल्या ध्वनीमर्यादा पातळीत तपासणी करण्यातआलेले २३ प्रकारचे बॉम्ब, रॉकेट वइतर फटाके पास झाले .



मंडळाने केलेल्या तपासणी वेळी२३ प्रकारच्या फटाक्यांचे आवाजमोजले. फटाके तपासण्याच्याठिकाणी ५ मीटर अंतरावर दोन ध्वनीमर्यादा मोजणी यंत्रे लावली होती. सर्वफटाक्यांची ध्वनीची पातळी पर्यावरणसंरक्षण कायद्यानुसार मर्यादितअसल्याचे दिसून आले. बॉम्बप्रकारामध्ये ९५ डेसिबल्स कमालमापन व फटाका माळांमध्ये ९७डेसिबल्स कमाल मापन नोंद झाली.ही तपासणी मंडळाचे उपप्रादेशिकअधिकारी अच्युत नांदवटे यांच्यामार्गदर्शनाखाली पार पडली. या वेळीपोलिस उपनिरीक्षक जगन्नाथमेनकुदळे उपस्थित होते.

फटाक्यांचा वापर जबाबदारीने करा

फटाक्यांच्या अतिवापराने श्वसनाचेआजार, रक्तदाब वाढणे, हृदयाचेठोके वाढणे, लहान मुले घाबरणे,गरोदर स्त्रियांना आणि गर्भाला इजाहोणे असे गंभीर परिणाम होऊशकतात. त्यामुळे सर्वांनीफटाक्यांचा वापर जबाबदारीनेकरावा, असे आवाहन महाराष्ट्रप्रदूषण नियंत्रण मंडळाकडूनकरण्यात आले आहे.

# गोवंश मांस विक्रीवरून अकोला शहरात तणाव:दोन गट समोरासमोर, पोलिसांमुळे अनर्थ टळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अकोला–** अकोला शहरातील बैदपुरा परिसरात गोवंश मांस विक्रीच्या संशयावरून शुक्रवारी दोन गट समोरासमोर आले होते. पोलिसांनी वेळीच धाव घेतल्याने अनर्थ टळला. यामध्ये काही जण किरकोळ जखमी झाले. या घटनेबाबत सिटी कोतवाली पोलिसांत परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या असून पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

एका संघटनेच्या काही जणांना माहिती मिळाली की, बैदपुऱ्यात गोवंश मांस विक्री



होत आहे. त्यावरून काहींनी तिकडे धाव घेतली असता दुसऱ्या समुदायातील काही जणांसोबत त्यांचा वाद झाला. त्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचताच जमाव पांगला. त्यानंतर आमदार साजीदखान पठाण, तसेच खासदार अनुप धोत्रे यांनीही धाव घेतली.

**दगडफेकीची अफवा–** बैदपुऱ्या मध्ये दोन गटांत दगडफेक झाल्याच्या अफवेने शहरात जोर धरला होता. मात्र, दगडफेक झाली नसल्याचे अपर पोलिस अधीक्षक रेड्डी यांनी स्पष्ट केले.

# अमरावतीत दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## सांस्कृतिक भवन परिसरात सणासुदीचा जल्लोष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती शहरातील सांस्कृतिक भवनात सुरु असलेल्या दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शनाला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असून, दररोज नागरिक, विद्यार्थी, कुटुंबे आणि कला प्रेमींची गर्दी होत आहे. या महोत्सवामुळे शहरात उत्सवमय वातावरण निर्माण झाले आहे.

अमरावती महानगरपालिका आणि विधिमंत्र संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या भव्य महोत्सवात दिवाळी सणाशी निगडित विविध सांस्कृतिक, पारंपरिक आणि कलात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. फोटोग्राफी प्रदर्शनात स्थानिक छायाचित्रकारांच्या आकर्षक कलाकृतींनी नागरिकांचे लक्ष वेधले आहे.

दिव्यांच्या रोषणाईत नटलेले सांस्कृतिक भवन, कलात्मक सजावट आणि पारंपरिक दिवाळीचे दर्शन यामुळे या प्रदर्शनाचे आकर्षण आणखी वाढले आहे.

या महोत्सवात दररोज सकाळीपासून सायंकाळपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत सादरीकरणे, नृत्यप्रदर्शन, तसेच विविध कलावंतांच्या सादरीकरणांचा समावेश असून नागरिकांना मनसोक्त मनोरंजनाचा आनंद घेता येत आहे. स्थानिक महिलांनी तयार केलेल्या हस्तकला, दिवे, फुलदाण्या, पारंपरिक सजावटी वस्तू आणि फोटोग्राफी स्टॉल्समुळे नागरिकांना खरेदीचीही उत्तम संधी मिळत आहे.

महानगरपालिकेच्या उपक्रमाला नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे प्रशासनाने समाधान व्यक्त केले आहे. शहरातील प्रत्येक नागरिकाने आपल्या कुटुंबीयांसह या दिवाळी आनंदोत्सव व फोटोग्राफी प्रदर्शनाला अवश्य भेट द्यावी. हा उत्सव अमरावतीच्या संस्कृतीचा उत्सव आहे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

हा भव्य सांस्कृतिक महोत्सव २१ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून दररोज सकाळी १०.०० ते रात्री ९.०० या वेळेत नागरिकांसाठी खुला आहे.

सांस्कृतिक भवन परिसर सध्या दिवाळीच्या झगमगाटात उजळून निघाला असून, ‘आनंदोत्सव’ हे नाव खऱ्या अर्थाने सार्थ ठरत आहे.

# ‘मराठी अर्थशास्त्र परिषदे’चा सामाजिक मदतीचा हात

## मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ३.६२ लाखांचा निधी सुपूर्द, अतिवृष्टी आणि महापूरग्रस्तांना मदत

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१८संभाजी नगर–** महाराष्ट्रातील पूरग्रस्त आणि अतिवृष्टी बाधित भागातील बांधवांना मदत करण्यासाठी ’मराठी अर्थशास्त्र परिषदेने’ (चएउ) पुढाकार घेत मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये ३,६२,८८० रुपयांचा निधी जमा केला आहे. परिषदेने आपला सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग म्हणून हा निधी जमा केला असून, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत धनादेशाद्वारे हा निधी सुपूर्द करण्यात आला.

राज्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे शेती, घरे, पशुधन, उद्योग आणि पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. याची गांभीर्याने दखल घेत मराठी अर्थशास्त्र परिषदेने नुकसानग्रस्तांना मदत करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार परिषदेचे पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्यांनी तातडीची बैठक घेऊन समन्वय समिती स्थापन केली. या समितीने परिषदेच्या २१५८ आजीव सदस्यांना आर्थिक मदतीसाठी आवाहन केले.

या आवाहनाला प्रतिसाद देत, २८ सप्टेंबर २०२५ ते १४ ऑक्ट २०२५ या कालावधीत परिषदेच्या २५१ सदस्यांनी तसेच काही इतर मान्यवरांनी एकूण ३,६२,८८० रुपये एवढा निधी जमा केला. हा निधी धनादेश क्रमांक ६३७४९९ (केनरा बँक, अंबड, जि. जालना) द्वारे मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करण्यात आला.



मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्य महाराष्ट्रातील अर्थशास्त्राच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण आहे. ९ जानेवारी १९७७ रोजी स्थापन झालेली ही परिषद आज महाराष्ट्रासह देशातील व विदेशातील २१५८ आजीव सभासदांची संघटना बनली आहे. मराठी भाषेतून अर्थशास्त्रीय ज्ञान आत्मसात करणाऱ्या या परिषदेद्वारे वर्षभर व्याख्याने, परिसंवाद आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात.

मागील ४८ वर्षांपासून परिषदेने (केवळ कोरोनाचा एक वर्षाचा अपवाद वगळता) सातत्याने तीन दिवसीय वार्षिक अधिवेशने भरवून धोरण निश्चितीमध्ये महत्त्वाची भूमिका निभावली आहे. तसेच, ’अर्थसंवाद’ हे त्रैमासिक नियतकालिक प्रकाशित करून राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील विविध आर्थिक मुद्दे, सरकारी धोरणे आणि विकास योजना यावर सखोल चर्चा, संशोधन आणि प्रबोधन करण्याचे कार्य अविरतपणे सुरू ठेवले आहे.

परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांची अशी अपेक्षा आहे की, जमा झालेला हा निधी राज्यातील अतिवृष्टीग्रस्त, पूरग्रस्त आणि नुकसानग्रस्तांना, विशेषतः शैक्षणिक नुकसानग्रस्त विद्यार्थ्यांना मदत म्हणून उपयोगात आणला जावा. परिषदेचे सदस्य डॉ. विलास खंदारे, डॉ. विकास सुकाळे, डॉ. मारोती तेगमपुरे, आणि इतर सदस्यांनी (डॉ. जीवन सोळुंके, डॉ. गणेश गावंडे, डॉ. सुभाष सावंत, डॉ. जितेंद्र तलवारे, डॉ. हनुमंत भोसले, डॉ. राजाराम पाटील, डॉ. धैर्यशील सोळुंके) जिल्हाधिकाऱ्यांकडे हा निधी सुपूर्द करण्याची विनंती केली.

# सोयाबीनवर पावसाचा मारा; आधारभूत किंमतही मिळेना

## पूर्वी एका रोपट्यावर १०० शेंगा, आता केवळ १०

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८यवतमाळ –** शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या उद्देशाने यंदाही शासनाकडून सोयाबीन खरेदी केंद्रे सुरू करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहेत. मात्र, अतिवृष्टी, पिकाची खराब गुणवत्ता आणि उत्पादनात झालेली मोठी घसरण यामुळे या वर्षी शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत मिळण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे स्पष्ट होत आहे.

विदर्भावर दुहेरी संकट असून या वर्षी फक्त मारेगाव नव्हे तर संपूर्ण विदर्भातील सोयाबीन पिकावर हवामानाची दुहेरी मार बसली आहे. पेरणीनंतर चांगल्या पावसाची आस धरलेल्या शेतकऱ्यांना अतिवृष्टी, मोझॅक रोग आणि चारकोल संसर्गामुळे मोठा फटका बसला आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, पूर्वी एका रोपट्यावर शंभर शेंगा लागायच्या, आता फक्त पाच ते १० तयार होतात, त्यातील ३० टक्के शेंगा सडलेल्या किंवा अपूर्ण विकसित आहेत. आणी काही खराब झाल्या आहेत. त्यामुळे उत्पादनात मोठी घसरण निश्चित आहे. काही प्रमाणात सोयाबीन निघणे सुरु झाले आहे. दारवर्षी च्या तुलनेत या वर्षी उत्पादनात घट होत असून सोयाबीन चपटे बारीक झाले आहे. अजून पर्यंत सोयाबीन खरेदी सुरु झाली नाही. सोयाबीन विकून थोडी फार रकमेतून दिवाळी साजरी झाली असती परंतु अजून



पर्यंत खरेदीला सुरुवात झाली नसल्याने शेतकऱ्यांना पुन्हा प्रतीक्षा करावी लागणार आहे. खरेदी सुरु होते की नाही शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे त्यामुळे अनेक शेतकरी नोंदणी करण्यास टाळाटाळ करतील, कारण त्यांना भीती आहे की त्यांना आधारभूत किंमत मिळणार नाही किंवा देयकासाठी दिर्घ प्रतिक्षा करावी लागेल. शासनाने यंदा सोयाबीनचा किमान आधारभूत दर निश्चित केला आहे. मात्र हा दर मिळवण्यासाठी सोयाबीनचा दर्जा (ग्रेड) ठरलेल्या मानकांनुसार असणे आवश्यक आहे. खराब दर्जामुळे विपणन महासंघ व खरेदी केंद्रांना खरेदी प्रक्रियेत अनेक अडचणींना सामोरे जावे लागू शकते. शेतकऱ्यांनी शासनाकडे प्रती क्विंटल किमान एक हजार पाचसे रुपयांनी आधारभूत किंमत वाढवण्याची मागणी केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, उत्पादन घटले आहे, खर्च वाढला आहे आणि दर्जाही घसरला आहे. अशा परिस्थितीत विद्यमान दरात दिलासा मिळणं शक्य नाही. या वर्षाला तालुक्यात पाच हजार दोनशे तीन हेक्टर क्षेत्रात सोयाबीन ची पेरणी झाली होती, मात्र सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे स्वप्न धुळीत मिळाले आहे. या वर्षी सुमारे पाच हजार हेक्टर क्षेत्रात सोयाबीनची पेरणी झाली आहे. आता कापणीला प्रक्रिया सुरू झाली आहे . त्यामुळे खरेदी व देयक प्रक्रियेत उशीर होण्याची शक्यता आहे.

# ‘निराधारांचे आधार’ बनले बडनेराचे आधार केंद्र –प्राचार्य डॉ. सुभाष गवई

## काळजीवाहक ज्योती राठोड, राजीव बसवनाथेंच्या कामाचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८बडनेरा** बेघर, बेवारस, निराधारांना आधार देऊन त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्याची काळजी वाहणारे, प्रसंगी इहलोकीची यात्रा करणाऱ्यांच्या अंत्यसंस्कार विधीचीही जबाबदारी स्वीकारणारे राजीव बसवनाथे व ज्योती राठोड यांचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. बेघर मायबापाची सेवा करणे हेच पुण्य कर्म असून, त्यासाठी मंदिरात जाण्याची काहीच गरज नसल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी केले. राजीव बसवनाथे आणि ज्योती राठोड या केंद्राचे काळजीवाहक असून राठोड यांच्याकडे व्यवस्थापनाचीही जबाबदारी आहे.

महापालिका आणि राष्ट्रीय उपजीविका अभियानांतर्गत पब्लिक एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या माध्यमातून बडनेरा येथे ‘आधार’ या नावाने शहरी बेघर लोकांसाठी निवारा केंद्र चालवले जाते. जागतिक बेघर दिनानिमित्त या केंद्राद्वारे नुकतेच आठवडाभर वेगवेगळे कार्यक्रम घेण्यात आले. या सप्ताहाचा समारोप तपोवन येथील विदर्भ महारोगी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य




डॉ. सुभाष गवई यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. उद्घाटन मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय जैन संघटनेचे माजी अध्यक्ष सुदर्शन गांग (जैन) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. गोविंद कासट, मनपाचे उपायुक्त योगेश पिठे व नरेंद्र वानखडे, अभियंता श्रीरंग तायडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य गवई पुढे म्हणाले, राजीव बसवनाथे व ज्योती राठोड यांचे कार्य अनुकरणीय आहे. आपल्यापैकी बरेच जण स्वत:ला देव कार्यात वाहून घेतात. मात्र या दोघांनी निराधारांची सेवा हेच खरे देवकार्य मानले आहे. अर्थात मानवसेवा हिच ईश्वर सेवा आहे, या सुभाषिताला त्यांनी मूर्त स्वरूप प्रदान केले आहे. या वेळी इतर मान्यवरांनीही आपले विचार मांडले. प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव बसवनाथे यांनी केले. प्रास्ताविक मनपाचे बडनेरा झोनचे सहायक आयुक्त धनंजय शिंदे यांनी केले. अमरावती येथील प्रसिद्ध गायिका सरिता हनुमंते यांनी आपल्या सुमधुर आवाजात स्वागत गीत सादर केले. आभार केंद्राच्या व्यवस्थापक ज्योती राठोड यांनी मानले. या वेळी जवाहर गांग, मनपाच्या बडनेरा झोनचे अभियंता राजेंद्र तांबेकर, आधार केंद्राची पालक संस्था असलेल्या एनयूएलएमचे व्यवस्थापक भूषण बाळ, पत्रकार सुभाष दुबे, समुदाय संघटिका रेणुका कापूसकर, सामाजिक कार्यकर्ते प्रफुल्ल कुकडे, रोहित घोंगडे, विलास थोरात, किशोर मरकाम व निवारावासी उपस्थित होते. तब्बल दहा दिवस राबवण्यात आलेल्या बेघर सप्ताहादरम्यान अंधश्रद्धा निर्मूलन शिबिर, व्यसनमुक्ती कार्यशाळा, आरोग्य तपासणी शिबिर, डोळे तपासणी शिबिर, दंत व मुखरोग चिकित्सा शिबिर, रक्त तपासणी शिबिर, आधार केंद्रातील रहिवाशी आजी –आजोबांच्या सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी लिंबू चमचा, संगीत खुर्ची आणि वेगाने चालण्याची स्पर्धा, नृत्य तसेच गीत गायन, भजन इत्यादी उपक्रम राबवण्यात आले.

# बीडच्या ओबीसी महाएल्गार सभेत जातगणनेचे आवाहन

## मंत्री भुजबळांकडून जरांगे, विखे लक्ष्य, धनंजय मुंडेंचीही टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८बीड**

आमचा मराठा समाजाला कुठलाही विरोध नाही. मराठा समाज व ओबीसींमध्ये आंतर पाडण्याचे काम आंतरवालीच्या पाटलांनी केले, असा घणाघाती आरोप करत राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री तथा ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील व मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना लक्ष्य केले. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांची व मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीची चित्रफित 'दाखव रे तो व्हिडिओ' अशा शैलीमध्ये बोलत भुजबळ यांनी वडेट्टीवारांवरही टीकास्त्र सोडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातगणना करावी, असे आवाहनही भुजबळ यांनी केले. या मेळाव्यात माजीमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी थेट नामोल्लेख टाळून जरांगे पाटील यांच्यावर टीका केली.



बीड येथील महाएल्गार सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार गोपीचंद पडळकर, ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके, प्रकाश शेंडगे, नवनाथ वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. मेळाव्याला मोठी गर्दी होती. यावेळी भुजबळ यांनी राधाकृष्ण विखे पाटील जरांगेंना जाऊन भेटतात, याकडे लक्ष वेधत हैदराबाद गॅझेटवरून काढलेल्या अध्यादेशावरून टीका केली. अध्यादेशातील पात्र हा शब्द एका तासात बदलून दिला जातो. कुणबीसाठी सकाळी अर्ज केला की सायंकाळपर्यंत प्रमाणपत्र दिले जात आहे. इतकी यंत्रणा गतिमान कधीपासून झाली, असा सवाल भुजबळांनी मुख्यमंत्री व महसूलमंत्र्यांना विचारला.भुजबळांनी जरांगे पाटील यांना लक्ष्य केले. ते म्हणाले, मुंबईतील आंदोलनात सहभागी झालेल्यांमध्ये बहुतांश हे वाळूचोर, दारूवाले आदींचा भरणा होता. तुम्ही पाडण्याचे आदेश देऊ शकता, तसे आम्हीही देऊ शकतो, हे ध्यानात ठेवावे. ५४ टक्के ओबीसी, १३ टक्के दलित, ७ टक्के आदिवासी, ३ टक्के ब्राह्मण मग उरलेल्यामध्ये किती मराठा समाज आहे, असा प्रश्नही भुजबळ यांनी केला. मुख्यमंत्र्यांना उद्देशून भुजबळ म्हणाले, फडणवीस यांना आम्हाला सांगायचे आहे की, ही मंडळी तुमच्या वाईटावर आहे, त्यांचे लक्ष्य ओबीसी नव्हे तर मुख्यमंत्री फडणवीस आहेत, असेही भुजबळ म्हणाले.आमदार धनंजय मुंडे यांनीही मनोज जरांगे पाटील यांना थेट नामोल्लेख टाळून लक्ष्य केले. त्यांनी मराठा समाजाच्या आम्ही विरोधात नसून, त्यांना १० टक्के आरक्षण दिलेले आहे ते त्यांनी घ्यावे, असे आवाहन करून ओबीसींसाठी आत्महत्या करणाऱ्यांच्या कुटुंबीयांना २५ लाखांची मदत करावी, अशी मागणीही मुंडे यांनी केली.

# अचानक हादरे, घरातली भांडी खाली! अमरावती जिल्ह्यात भूकंपाची पुन्हा नोंद

## जिल्हा प्रशासनाला तलाठी आणि ग्रामसचिवांनी दिली माहिति

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८शिवणगाव**

जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील शिवणगाव फत्तेपूर येथे शुक्रवारी दुपारी १.१५ ते १.२० वाजताच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. या भूकंपाच्या धक्क्यामुळे कोणतीही जीवित वा वित्तहानी झालेली नाही. गावात उपस्थित असलेल्या तलाठी आणि ग्रामसचिवांनी ही माहिती जिल्हा प्रशासनाला दिली.दुपारी अचानकपणे परिसरात हादरे जाणवले. काही लोकांच्या घरातील भांडी खाली पडली. त्यामुळे एकच खळबळ उडाली.




यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांना पत्राद्वारे ही माहिती कळवली आहे. शिवणगाव फत्तेपूर येथे दुपारी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली. याआधी सुद्धा परिसराममध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते.

या धक्क्यांमुळे कुठल्याही प्रकारची हानी झालेली नाही. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर भूकंपाच्या तीव्रतेबाबत कोणताही संदेश प्राप्त झालेला नाही. भूकंपाच्या सौम्य धक्क्यामुळे परिसरातील गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भूकंपाची तीव्रता आणि क्षेत्रीय तपासणी (सर्वेक्षण) करण्यासाठी भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण, मध्य विभाग, नागपूर येथील पथक घटनास्थळी पाठवण्याबाबत भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अतिरिक्त महासंचालकांना पत्राद्वारे विनंती करण्यात आली आहे.

गेल्या ७ सप्टेंबरला तिवसा तालुक्यातीलच शिरजगाव मोझरी येथे भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते. गावात सकाळी अचानक अनेक घरात पाट्यांवर ठेवलेली भांडी जमिनीवर कोसळली. अनेकांना शेतात जमिनीला हादरा बसतोय असे लक्षात आले. या प्रकारामुळं ग्रामस्थांमध्ये भीती पसरली होती. अनेक जण घराबाहेर धावत येऊन मोकळ्या जागेवर उभे राहिले होते. दोन वर्षांपूर्वी देखील जमिनीला हादरा बसल्याची घटना घडली होती, असे गावकऱ्यांनी सांगितले.

शिरजगाव मोझरी येथे भूकंपाचे धक्के बसल्याबाबत नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजी या संस्थेच्या यांच्या संकेतस्थळावर भूकंपाचे धक्के बसल्याबाबत कोणतीही नोंद आढळली नव्हती. तहसीलदारांसह महसूल विभागांचे पथक शिरजगाव मोझरी गावात जाऊन आलेत. गावात कोणतेही नुकसान झाले नाही असे आढळले होते.

जून महिन्यात चार तारखेला रात्री नऊ वाजता अमरावती जिल्ह्यात मध्य प्रदेशच्या सीमेवर रिश्टर स्केलवर ३.८ तीव्रतेचा भूकंप झाला होता, ही माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने तसेच नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राने दिली होती. या भूकंपामुळे कोणतेही नुकसान झाले नव्हते. मध्य प्रदेशातील खंडवा आणि बऱ्हाणपूर जिल्ह्यातही भूकंपाचे धक्के जाणवले होते. भूकंपाचा केंद्रबिंदू हा जमिनीपासून दहा किलोमीटर खाली होता.

# गडचिरोलीच्या प्रशासकीय मॉडेलचा दिल्लीत डंका

## 'आदी कर्मयोगी अभियाना'ला राष्ट्रीय पुरस्कार
## जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**

दुर्गम आणि आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्याच्या प्रशासकीय कारभाराची आज राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. 'आदी कर्मयोगी अभियाना'अंतर्गत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांना आज राष्ट्रपती भवनात एका दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'उत्कृष्ट सार्वजनिक प्रशासना'च्या पुरस्काराने गौरवण्यात आले. महाराष्ट्रातून हा सन्मान मिळवणारा गडचिरोली हा एकमेव जिल्हा ठरला आहे.



तळागाळातील नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'आदी कर्मयोगी अभियान' प्रभावीपणे राबवले. याअंतर्गत ५५३ 'आदी सेवा केंद्रे' आणि ग्राम कृती आराखड्यांच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य आणि उपजीविकेच्या सोयी थेट नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आल्या. तसेच, ५ लाख हेक्टरहून अधिक वनजमिनीचे हक्क ग्रामसभांना देऊन त्यांचे सक्षमीकरण करण्यात आले.

हा पुरस्कार संपूर्ण गडचिरोली जिल्हा प्रशासन आणि येथील नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांचा सन्मान आहे. शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याच्या आमच्या संकल्पाला या पुरस्काराने नवी ऊर्जा मिळाली आहे, अशी भावना जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी पुरस्कार स्वीकारल्यानंतर व्यक्त केली. जिल्हाधिकारी पंडा यांनी भारत सरकारकडे या यशस्वी प्रशासकीय मॉडेलचे सादरीकरण केले होते. त्यांच्या या कार्याला मिळालेली ही राष्ट्रीय पोचपावती गडचिरोली जिल्ह्यासाठी एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे.

# महापालिका निवडणूक मतमोजणी केंद्रांची चाचपणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

राज्य निवडणूक आयोगाने महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची अंतिम प्रभाग रचना जाहीर करून निवडणूक होणार असल्याचे शिक्कामोर्तब केले आहे. आता महापालिका प्रशासनाने निवडणूक आयोगाच्या या गाइडलाइननुसार निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम हाती घेतला मंगळवारी निवडणूक विभागाच्या चमूने मतमोजणी केंद्राची चाचपणी केली.

मनपा प्रशासनाने मतदार यादी अपडेट कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याकरिता विधानसभा निवडणुकीची २०१७ च्या मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. मनपा निवडणुकीसाठी तयार केलेली मतदार यादी, हरकती व सूचना ६ नोव्हेंबररोजी प्रसिद्ध केल्या जातील. या प्रारूप मतदार यादी, हरकती व सूचना नागरिकांना १४ नोव्हेंबरपर्यंत दाखल कराव्या लागेल. प्रारूप मतदार यादीवर हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणीत करून २८ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. तसेच मतदान केंद्राच्या ठिकाणची यादी ४ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. मतदान केंद्रनिहाय मतदार यादी १० डिसेंबर २०२५ प्रसिद्ध केली जाईल प्रशासनाकडून मतमोजणी केंद्राची चाचपणी केली जात असताना जानेवारीत मनपा निवडणूक होण्याचे संकेत आहेत. अंतिम प्रभाग रचना जाहीर होताच इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. तर महापालिका प्रशासनाने या निवडणूकीच्या अनुषंगाने निर्देशानुसार तयारी चालविली आहे.

# 'जीएसटी'घटीचा परिणाम शून्य किमती वाढूनही दिवाळी खरेदी जोरात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

दिवाळी म्हटली की सर्वांनाच फराळाची उत्सुकता असते. दिवाळी अवघ्या काही दिवसांवर आल्याने फराळ बनविण्यासाठी गृहिणींची लगबग सुरू झाली आहे. चिवडा, शेव, चकली, विविध लाडू, शंकरपाळे, करंज्या आदी पदार्थासाठी लागणाऱ्या किराणा मालाची गृहिणी खरेदी करत आहेत. मात्र त्याचे दर वाढल्याने घरगुती फराळाला महागाईचा फटका बसला आहे. बाजारात तयार फराळ मिळत असला तरी त्याचे दर अधिक असल्याने मध्यमवर्गीयांचा घरीच बनविण्यावर भर असतो.१०० ते १५० रुपये किलो वाढले काजूचे दरसध्या चणाडाळ जिरे, धने, तेल आणि काजू यांच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे. काजूचे दर १०० ते १५० रुपये प्रतिकिलोने वाढले आहेत. तेलाच्या किमतीतही प्रतिलिटरमागे २० ते ३० रुपयांची वाढ झाल्याचे किराणा विक्रेत्यांनी सांगितले. परिणामी गृहिणींचे दिवाळीचे बजेट कोलमडले आहे. विशेष म्हणजे मागणी वाढली की दरवाढ होत असल्याचे प्रत्यय येतो.असे आहेत साहित्याचे दर.

### किराणा साहित्याचे दर

| | | |
|---|---|---|
| रवा | ४० | ४५ |
| मैदा | ४७ | ४८ |
| चणाडाळ | ७५ | ८५ |
| बेसन | ८० | १०० |
| तेल | १२० | १५० |
| साखर | ४० | ४५ |
| सुके खोबरे | २२० | ३३० |
| पातळ पोहे | ६० | ७० |
| चकली पीठ | १५० | १५० |
| शेंगदाणे | १०० | ११० |
| मैदा | ४० | ४५ |
| डालडा | १०० | |
| पिठी साखर | ४५ | ५० |

# अमरावती - शेगाव - अमरावती सायकल राईड सायकलिंग असोसिएशनचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

सायकलिंग असोसिएशनतर्फे रविवार १२ ऑक्टोबर २०२५ रोजी ऑडेक्स इंडिया रॅन्डोनिएरींगच्या अंतर्गत ३०० किमी राईडचे आयोजन केले गेले. यामध्ये अमरावती व्यतिरिक्त बुलढाणा, खामगाव, पांढरकवडा, परभणी जिल्हयातील एकूण २३ रायडर सहभागी झाले होते. ही ३०० किमी राईड २०:०० तासांच्या आत पूर्ण करायची होती. अमरावती सायकलिंग असोसिएशन अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी आणि विदर्भकेसरी संजय तिरथकर यांनी रविवार १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ५.३० वाजता या राईडला झेडी दाखवून सुरुवात केली.

यावेळी संघटनेचे सचिव अतुल कळमकर, सदस्य सचिन पारेख, विनोद वानखडे, नितीन अंबारे, गजेंद्र सदार, संजय मेंडसे आदी सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. ही राईड जिल्हा स्टेडियम येथे आरंभ होउम एक्स्प्रेस हाय वे, मुर्तीजापूर, अकोला, बाळापूर, शेगाव येथून यु-टर्न घेऊन पुन्हा त्याच मार्गे जिल्हा स्टेडियमवर याची सांगता करण्यात आली.

या राईडसाठी प्रमुख राईड रिस्पॉन्सिबल म्हणून अमरावती सायकलिंग असोसिएशनचे सदस्य लक्ष्मीकांत खंडागळे यांनी प्रवीण जयस्वाल यांच्या सहकार्याने महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. या राईडच्या यशस्वीतेसाठी अमरावती सायकलिंग असोसिएशनच्च्या इतर सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

या ३०० व्या राईडमध्ये किशोर शिरभाते, विनोदसिंग चौहान, समीर बगाडे, आशिष गावंडे, पवनकुमार रामावत, संजय राठोड, अतुल तायडे, राजेंद्र महाजन, भरत मालानी, विष्णू भगवान गाढे, दीपक कयाल, शिवाजी गोलाईत, ओम जाधव, अनिता राठोड, अजय बोले, विद्या सानप, संतोष सानप, नरेंद्र भटकर, राजू धोटे, महेश गट्टाणी, विनोद बलांसे, सहदेव कोंकटवार, वर्षा सदार असे २३ रायडर सहभागी झाले होते. यामध्ये तीन महिला राईडरचासुद्धा सहभाग होता. विशेष बाब म्हणजे २३ रायडर पैकी २० राईडर्सनी राईड निर्धारित वेळेत पूर्ण केली.या स्पर्धकांना प्रोत्साहित करण्यासाठी पीयुष क्षीरसागर, अतुल कळमकर, रितेश जैन तिताजी, श्रीराम देशपांडे, नितिन बोरगावकर, प्रसाद पंत, शालिनी महाजन व गजेंद्र सदार हे जिल्हा स्टेडियमवर उपस्थित होते.

# इयत्ता दहावी व बारावीच्या संस्थांना शिक्षण मंडळाप्रमाणे समकक्षतेबाबत सूचना जारी

## यादी www.mahahsscboard.in संकेतस्थळावर उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्याव्दारे इयत्ता दहावी व बारावीची परीक्षा घेतल्या जाते. या मंडळाप्रमाणेच समकक्षतेबाबत मान्यता देण्यात आलेल्या संस्था, बोर्ड यांची मान्यताप्राप्त यादी मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याची सर्व संबंधित मान्यताप्राप्त शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, विद्यार्थी, पालक व नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन राज्य मंडळ, पुणेचे सचिव देविदास कुलाळ यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे ही एक स्वायत्त संस्था असून याव्दारे इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा घेतल्या जातात. महाराष्ट्र राज्याच्या या बोर्डाकडे समकक्षता मिळण्यासाठी इतर संस्था, बोर्ड प्रस्ताव सादर करतात. सदर प्रस्तावांची पडताळणी करुन संबंधित संस्था, बोर्ड यांना इयत्ता दहावी व बारावी समकक्षतेबाबत मान्यता प्रदान करण्यात येते. उपरोक्तप्रमाणे समकक्षतेबाबत मान्यता देण्यात आलेल्या संस्था/बोर्ड यांची यादी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिर करण्यात आली आहे, असेही मंडळाव्दारे कळविण्यात आले आहे.

# सोनपावली आली दिवाळी घरोघरी दीप पुजनाची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

धनतेरस, किंवा धनत्रयोदशी ही आश्विन महिन्याच्या १३ व्या दिवशी असते. या दिवशी देवांचा वैद्य धन्वंतरी याचा जन्म झाला. म्हणून या दिवशी धन्वंतरीची पूजा करतात. काही लोक या दिवशी लक्ष्मी मातेची पूजा करतात. व्यापारी वर्गात संध्याकाळी दुकानांमध्ये पूजा केली जाते. हिशेबाच्या नव्या वह्यांचा वापर या दिवसापासून सुरू करण्याचा प्रघात आहे.



धनत्रयोदशीने आज दिवाळी १८ ऑक्टोबरपासून पर्वाला प्रारंभ होत आहे. त्यासाठी धार्मिक परंपरेनुसार घरोघरी पूजेची तयारी करण्यात आली आहे. ऐश्वर्य आणि वैभव देणारी ही त्रयोदशी विशेष महत्त्वाची मानली जाते. महासागरमंथनाच्या वेळी अत्यंत दुर्मिळ आणि मौल्यवान वस्तूंव्यतिरिक्त शरद पौर्णिमेचा चंद्र, कार्तिक द्वादशीला कामधेनू गाय, त्रयोदशीला धन्वंतरी आणि कार्तिक महिन्यातील अमावस्या तिथीला भगवती लक्ष्मी समुद्रातून अवतरली असे म्हणतात. दीपावली लक्ष्मीपूजनच्या दोन दिवस आधी भगवान धन्वंतरीचा जन्मदिवस धनत्रयोदशी म्हणून साजरा केला जातो.या दिवशी दागिने आणि भांडे केली जातात. भगवानधन्वंतरी हे देवांचे वैद्य आहेत.भारतात दिवाळीचा दुसरा दिवसम्हणजे आश्विन कृष्ण त्रयोदशीलाम्हणजेच धनत्रयोदशीला धन्वंतरीजयंती साजरी करतात. धन्वंतरी सागरमंथन वेळी अमृत घेऊन आले होते अशी आख्यायिका आहे. धन्वंतरी ह्यांना विष्णूचा अवतार व आयुर्वेदाचे आराध्य दैवत मानले जाते.

**नवीन वस्तू खरेदीचा शुभ मुहूर्त**

दिवाळी उत्सवातील दुसरा आणि अत्यंत शुभ दिवस म्हणजे धनत्रयोदशी, हा दिवस दीपोत्सवाच्या पाच दिवसांच्या आनंद मालिकेची औपचारिक सुरुवात मानली जाते. धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन वस्तू, सोनं, चांदी, भांडी, किंवा इतर मौल्यवान वस्तू खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जाते. असा विश्वास आहे की या दिवशी केलेली खरेदी वर्षभर समृद्धी आणि भाग्य वाढवते पंचांगानुसार, खरेदीसाठी शुभ मुहूर्त १८ ऑक्टोबर दुपारी १२.१८ पासून ते १९ ऑक्टोबर दुपारी १.५१पर्यंत राहील. या कालावधीत खरेदी केल्यास ती लक्ष्मी प्राप्तीसाठी मंगलकारक मानली जाते.

# धनत्रयोदशीचा शुभमुहूर्त ! दागिने खरेदीसाठी नागरिकांची झुंबड





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

सर्वत्र दिवाळीचा उत्साह पाहायला मिळत आहे. आज धनत्रयोदशी आहे धनत्रयोदशीच्या दिवशी थोडेफार का होईना सोने खरेदी करून त्याचं घरात पूजन केलं तर घरामध्ये बरकत असते अशी नागरिकांची भावना आहे. याच भावनेतून आज धनत्रयोदशी दिवशी अमरावती शहरातील सराफ बाजारात सोने खरेदीसाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केल्याचे पाहायला मिळालं. सकाळपासूनच आज सराफ बाजारात ग्राहकांची गर्दी ही दिसून आली. ग्राहकांच्या गर्दीमुळे सराफा बाजार आज चांगलाच गजबजल्याच पाहायला मिळालं.दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सराफ व्यावसायिकांकडून ग्राहकांसाठी वेगवेगळ्या आकर्षकाच्या डिझाईन मध्ये सोन्याचे दागिने उपलब्ध करून देण्यात आले आहे तसेच लक्ष्मीपूजन लक्षात घेता चांदीची लक्ष्मी चांदीचा लक्ष्मीची शिक्के सुद्धा उपलब्ध करून देण्यात आले असून हे खरेदी करण्याकडेही ग्राहकांचा मोठा कल दिसून येत आहे.

# हा तर भाऊसाहेबांच्या समर्पणाचा गौरव : आ प्रताप अडसड

## कृषी महर्षीच्या जन्म गावी कृषी महाविद्यालय : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मानले आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धामणगाव रेल्वे**

भारत कृषक समाजाची स्थापना करून संपूर्ण शेतकरी समाजाला राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ निर्माण करून देणारे भारताचे प्रथम कृषिमंत्री, कृषिरत्न, शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या जन्मगावी पापळ येथे कृषी महाविद्यालय निर्माण केल्याबद्दल आ प्रताप अडसड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले असून हा तर भाऊसाहेबांच्या समर्पणाचा गौरव असल्याचे मत व्यक्त केले.

धामणगाव रेल्वे मतदार संघातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील भाऊसाहेबांच्या पापळ या जन्मगावी कृषी महाविद्यालय व्हावे यासाठी विदर्भ वैधानिक विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष अरुणभाऊ अडसड आमदार असताना सातत्याने विधानभवनात प्रत्येक अधिवेशनात ही मागणी लावून



धरली होती त्यानंतर आमदार प्रताप अडसड यांनी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे पापळ येथे आले असताना त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या मागणीचा पाठपुरावा केला गत हिवाळी व पावसाळी अधिवेशनात सुद्धा पापळ येथे कृषी महाविद्यालय व्हावे ही सातत्याने मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी कृषी महर्षीच्या जन्मगावी पापळ येथे कृषी महाविद्यालय मंजूर केल्या बद्दल त्यांचे आभार आ अडसड यांनी मानले.शेतकऱ्यांची कर्जातून मुक्तता करणारा कर्ज लवाद कायदा पारित करण्यात भाऊसाहेबाचा मोठा वाटा आहे त्यामुळे त्यांना हिंदुस्थानच्या कृषक क्रांतीचे जनक म्हणून संबोधले जाते भाऊसाहेबाच्या जन्मगावी पापळ येथे कृषी महाविद्यालय स्थापन करून परिसरातील शेतकरी पुत्रांना मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी न्याय दिला असल्याचे मत आ प्रताप अडसड यांनी व्यक्त केले.

# आरएसएसच्या शताब्दी वर्षानिमित्त वर्षभरात १०० कार्यक्रमांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शंभराव्या वर्षानिमित्त वर्षभरात १०० विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. हे उपक्रम चंद्रकुमार मधुसूदन जाजोदिया (सदस्य, भारतीय जनता पार्टी) आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या मार्गदर्शनाखाली होणार आहेत.

या उपक्रमांचा उद्देश सनातन धर्माचा प्रचार, समाजात धार्मिक व सामाजिक एकता वाढवणे, आणि संघाच्या शंभर वर्षांच्या




योगदानाचे स्मरण करणे आहे.

कार्यक्रमांत पारधी वस्ती व झोपडपट्टी भागांमध्ये १० भागवत कथा, १० वृक्षारोपण उपक्रम, नेत्रदान व नेत्रप्रत्यारोपण मोहीम, रक्तदान शिबिरे, १० देशभक्तीपर कार्यक्रम समाविष्ट आहेत. तसेच संघाच्या कार्यावर आधारित प्रदर्शन, लघुपुस्तिका प्रकाशन, निबंध स्पर्धा, विचारमंथन, आणि संत संमेलनांचे आयोजनही केले जाईल.हिंदू राष्ट्र संकल्पना समाजात पोहोचवण्यासाठी संतांच्या माध्यमातून विशेष जनजागृती मोहीम राबवली जाईल. शहीद कुटुंबीय व शेतकऱ्यांसाठीही विशेष कार्यक्रम होतील.या कार्यक्रमांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय जनता पार्टी, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, आर्ट ऑफ लिव्हिंग, पतंजली योग समिती, ब्रह्मकुमारी, वारकरी संप्रदाय, महानुभाव पंथ, इस्कॉन आणि इतर अनेक हिंदू संघटनांचा सहभाग असणार आहे.संत, समाजसेवक आणि विविध संस्थांचे प्रतिनिधी या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणार असून, सांसद अनिल बोंडे यांनीही या उपक्रमांना पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले आहे.

# महिनाभरात फक्त २७ ओबीसी प्रमाणपत्र जारी आकडे बोलतात, आपली भूमिका योग्यच : तायवाडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर**

मराठा समाजाला आरक्षण देणारा जीआर २ सप्टेंबर रोजी निघाल्यानंतर त्यावर ओबीसी नेत्यांनी बरीच टीका केली. मात्र, या जीआरमुळे ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, अशी भूमिका आपण मांडली होती. २ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबरपर्यंत म्हणजे महिनाभरात मराठवाड्यात फक्त ७३ अर्ज आले. त्यापैकी फक्त २७ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. बाकी अर्ज अजूनही मान्य केलेले नाहीत. या आकडेवारीवरून कुठेही अपात्र व्यक्तीला व सरसकट आरक्षण दिल्याचे स्पष्ट होत नाही. आता आकडेच बोलत आहे की, आपली भूमिका योग्य होती, असा टोला राष्ट्रीय ओबीसी




महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी विरोधकांना लगावला. डॉ. तायवाडे म्हणाले, मराठा प्रमाणपत्रासाठी ज्यांचे अर्ज मान्य केले आहेत त्यांच्या वडिलांकडे कदाचित आधीच प्रमाणपत्र असेल.

'जीआर'नंतर मराठवाड्यातील कुठल्याही जिल्ह्यात ओबीसी प्रमाणपत्रासाठी रांगा लागलेल्या दिसत नाही. यावरून ज्यांच्याकडे कागदपत्रे नाहीत ते अर्जच करू शकत नाही, हे स्पष्ट होते. आम्ही शासन निर्णयाचा व त्यातील संदर्भाचे वाचन केले. या शासन निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का लागत नाही, या निष्कर्षावर आम्ही पोहोचलो होतो. तीच भूमिका आम्ही मांडली. त्या भूमिकेवर आम्ही आजही कायम आहोत असे ते म्हणाले.

काही ओबीसी नेते स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी समाजाला वेठीस धरत आहेत. त्यांनी समाजाची दिशाभूल होणार नाही याची काळजी घ्यावी, असा सल्लाही डॉ. तायवाडे यांनी दिला. समाजात चुकीचा मेसेज सामूहिकपणे दिला जातो तेव्हा समाजात भिती निर्माण होते. यातूनच १४ ते १५ ओबीसी बांधवांनी आत्महत्या केल्या. त्यामुळे सर्व नेत्यांची ही सामूहिक जबाबदारी आहे की, त्यांनी समाजबांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# मतदानासाठी पात्र; पण नोंदणीअभावी वंचित राहणार

## ऑक्टोबर २०२४ नंतर राज्यात नवीन मतदारांची नोंदणीच झाली नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंतची मतदार यादी ग्राह्य धरली आहे. मात्र, ऑक्टोबर २०२४ नंतर राज्यात नवीन मतदारांची नोंदणीच होऊ शकलेली नाही. परिणामी, गेल्या वर्षभरात वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या तरुणांना आगामी निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता येणार नाही.विधानसभा निवडणुकीसाठी शेवटची मतदार नोंदणीची संधी १९ ऑक्टोबर २०२४ होती.या तारखेपर्यंत अर्ज न केलेल्या आणि ऑक्टोबर २०२४ नंतर वयाची अर्हतापूर्ण झालेल्या युवकांना पुढील निवडणूक होईपर्यंत मतदानाचा अधिकार मिळणार नाही.त्याचा परिणाम गेल्या वर्षभरात १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सर्व युवकांना मतदार यादीत



नोंद केला गेला नाही.आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये मतदानाचा अधिकार मिळणार नाही. स्थानिक निवडणुकांसाठी जुलै २०२५ पर्यंतची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आली.

### पुनरावलोकन आवश्यक

मतदार याद्या तयार करताना चार पात्रता दिनांक ग्राह्य धरल्या जातात. त्यामध्ये १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै आणि १ ऑक्टोबर या तारखांची मर्यादा देण्यात आली आहे. त्यानुसार दर तिमाहीत एक सारांश पुनरावलोकन करणे आवश्यक आहे; परंतु २०२४ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुका पूर्ण झाल्याने पुढील निवडणुका लागेपर्यंत त्याची आवश्यकता नसल्याने आयोगाने परिपत्रक अद्ययावत केले नसल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### आयोगाने सुधारित परिपत्रक न काढल्याने घोळ

१ जुलै २०२५ पूर्वी मतदार यादीत नाव नोंदवलेले असेल, तरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदान करता येईल.ऑक्टोबर २०२४ नंतर मतदार नोंदणी थांबविल्यामुळे अनेक युत पहिल्या मतदानाच्या संधीपासून वंचित राहतील.

आयोगाने सुधारित परिपत्रक न काढल्याने घोळ झाल्याची चर्चा मतदारांमध्ये होत आहे.

# शेफ विष्णू मनोहर करणार सलग २५ तास डोसे बनविण्याचा विक्रम; नागपूर नंतर आता अमरावतीत होणार नवा विक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

विख्यात शेफ विष्णू मनोहर हे अमरावती शहरात जुन्या बायपासवर स्थित गुणवंत लॉन येथे सलग २५ तास डोसे बनवण्याचा विक्रम नोंदवण्यास सज्ज झाले आहेत. शनिवारी सकाळी सात वाजल्यापासून चवदार डोसे बनविण्यास सुरुवात झाली असून या डोशांची चव चाखण्यासाठी खवय्यांची गर्दी उसळली आहे.

गतवर्षी दिवाळीच्यापर्वावर नागपूर शहरात सलग २४ तास डोसे बनवण्याचा विक्रम शेफ विष्णू मनोहर यांनी केलाय. आता आपलाच विक्रम मोडण्यासाठी त्यांनी अमरावती शहरात २५ तास डोसे बनविण्याचा निर्णय घेतला आहे. रेसिपी क्षेत्रात आजवर तीस विक्रमांची नोंद विष्णू मनोहर यांच्या नावावर असून आता अमरावतीत एकतिसावा विक्रम





नोंदवण्यास त्यांनी सुरुवात केली आहे.

**गरमा-गरम डोसे खाण्यासाठी खवय्यांची गर्दी**

सलग २५ तास डोसे बनवण्याचा विक्रम अमरावतीत नोंदवला जात असताना, शनिवारी सकाळपासून विष्णू मनोहर यांचं विश्वविक्रमी काम पाहण्यास अमरावतीकरांनी गर्दी केली. विशेष म्हणजे याठिकाणी तयार होणारे डोसे हे निःशुल्क चाखायला मिळतात, हे कळल्यावर अमरावतीकरांच्या आनंदला पारा उरला नाही. अगदी मोठी रांग करून खवय्ये डोसाची चव चाखायला तुटून पडले होते. शनिवारी दिवसभर आणि रात्रभर चवदार डोशांची मेजवानी विष्णू मनोहर यांच्या विक्रमाच्या निमित्तानं अमरावतीकरांना मिळत आहे.

# पर्यावरणपूरक, सुरक्षितपणे साजरी करा दिवाळी

## आरोग्याची घ्या काळजी : पर्यावरणाचे रक्षण करणेही प्रत्येकांची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

दिव्यांचा सण असलेली दिवाळीअवघ्या काही तासांवर आला आहे. या सणानिमित्त सध्या सर्वत्र आनंद आणि उत्साहाचे वातावरण आहे. दीपोत्सव आणि फटाक्यांची आतषबाजी दिवाळीत केली जाते. मात्र,भरात उत्साहाच्या निष्काळजी, दुर्लक्ष झाल्यास आगीच्या दुर्घटना घडू शकतात. त्यामुळे दिवे लावताना व फटाके फोडताना योग्य ती काळजी घ्या. पर्यावरणपूरक, सुरक्षित दिवाळी



साजरी करा, आपल्यामुळे पर्यावरणाला, कुणाला त्रास होणार नाही, याची काळजी घ्या, असे आवाहन आरोग्यतज्ज्ञ तथा पर्यावरण अभ्यासकांनी नागरिकांना केले आहे.

फटाके फोडताना घ्या काळजीसुती कपडे परिधान करावेत, मुलांपासून फटाके लांब ठेवावेत, ते फटाके फोडत असताना मोठ्यांनी सोबत असावे, फटाके फोडताना नेहमी पादत्राणे वापरावीत, जवळ पाण्याची बादली ठेवावी आणि कोणाला भाजल्यास तत्काळ स्वच्छ पाण्याने तो भाग धुवावा, फटाके पेटविण्यासाठी अगरबत्ती किंवा फुलबाजी वापरावी.

या' गोष्टी आवर्जून टाळाइमारतीमध्ये, जिन्यावर किंवा टेरेसवर फटाके फोडू नयेत. रोषणाई करताना अधिकृत तंत्रज्ञांची मदत घ्यावी. ओव्हरलोडिंग टाळावे, आगकाडी अथवा लाइटरचा वापर टाळावा. झाडे, ओव्हरहेड तारा किंवा उंच इमारतीजवळ हवेत उडणारे फटाके फोडू नयेत. खिडक्यांच्या पडद्याजवळ पणत्या किंवा दिवे ठेवू नयेत. विजेच्या तारा, गॅस पाइपलाइन किंवा वाहनांजवळ फटाके फोडू नयेत.

### ध्वनी, वायुप्रदूषण टाळा

फटाके फोडताना लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी; तसेच ध्वनी आणि वायुप्रदूषण टाळण्याकडे लक्ष द्यावे. आगीसारखी कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ १०१ या अग्निशमन दलाला पाचारण करा.

# आधीच रस्ते उठले जीवावर, त्यात एसटीतूनही निघतो धूर ! प्रवासी कमालीचे संतप्त

## राज्य परिवहन महामंडळाच्या धावत्या बसमधून निघाला धूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

परतवाडा : अमरावतीहून परतवाडाकडे येणाऱ्या अमरावती आगाराच्या बसमधून बुधवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास अचानक धूर निघायला सुरुवात झाली. चालकाने बस थांबवली. प्रवासी सुखरूप खाली उतरले. सुदैवाने कुठलीच अनुचित घटना घडली नाही. मात्र, नेहमीच्या या प्रकाराने प्रवासी कमालीचे संतप्त झाले.

परतवाडा-अमरावती मार्गावरून सर्वाधिक प्रवासी वाहतूक आहे. आधीच रस्ते जिवावर उठले असताना नेहमीप्रमाणे परिवहन महामंडळाच्या बसमधून जीवघेणा प्रवास नागरिकांना करावा लागत आहे. बुधवारी रात्री ८ वाजता अमरावती आगाराची साधारण बस आष्टी नजीक येताच धूर निघायला सुरुवात झाली. प्रवाशांच्या लक्षात येताच बसचालकाने थांबवून प्रवासी बाहेर काढले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला.महामंडळाच्या बसगाड्या भंगार असताना बुधवारी अचानक बंद पडलेली बस प्रवाशांनी ढकलून सुरू केली. पुढे जाताच त्यातून पुन्हा धूर निघाला असल्याचे बसमधील प्रवासी शेख मोहसीन शेख मोबीन यांनी लोकमतशी बोलताना सांगितले. प्रवाशांना मागून लागलीच आलेल्या ईव्ही बसमध्ये पुढील प्रवास करावा लागला, अन्यथा अर्धा ते एक तास मार्गावर पुढील बसची वाट बघत ताटकळत बसावे लागले असते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत